# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. ०३/०२/२००७

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शनिवार दिनांक ०३/०२/२००७ रोजी सभा सुचना क्र. २७ दि. २९/०१/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ५) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ६) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ७) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ८) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| ९) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| १०) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ११) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |
| १२) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| १३) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |
| १४) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |
| १५) | श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |

**मा. सभापती सो. :-**

आजच्या मा. स्थायी समितीचे सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या यांचे स्वागत करून सभेच्या कामकाजाला सुरूवात करण्याबद्दल मी नगरसचिव साहेबांना सुचना करतो.

(नगरसचिवांनी विषय पत्रिकेचे वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, मिटींग सुरू करण्यापुर्वी एक निवेदन करू इच्छितो आणि जर अभिनंदन त्या ठरावात मांडणार असतील तर त्या ठरावामध्ये मांडू या.

**मा. सभापती सो. :-**

बोला.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपल्या महाराष्ट्रामध्ये मिरा-भाईंदर महानगरपालिका आहे. एक मोठी महानगरपालिका आहे. तिची स्थायी समितीची सभा आहे. झालेल्या दहा महानगरपालिकेच्या निवडणूकीमध्ये मुंबई, ठाणे, उल्हासनगर, नागपूर, इ. मध्ये भारतीय जनता पार्टी, शिवसेना युतीने मोठे प्रचंड यश मिळवले व भगवा फडकवला. याबद्दल मी अभिनंदनाचा ठराव मांडतो. महानगरपालिकेची पुढची नावे तुम्ही घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

(अभिनंदन ठरावाचे वाचन केले.)

**जेन्वी अल्मेडा :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती सो. :-**

सदर ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**रोहिदास पाटील :-**

अभिनंदनाचा ठराव मांडते वेळी सभागृहाच्या कामकाजाच्या दृष्टीकोनातून मी सभासदांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, या समित्या जेवढ्या निवड करतात. ज्या सभागृहातल्या संख्याबळानुसार आणि पक्षबळानुसार प्रतिनिधित्व द्यायला पाहिजे होते. परंतु, तुम्ही कोणीही या समितीमध्ये भारतीय जनता पार्टीला कोठेही प्रतिनिधित्व दिले नाही. त्यामुळे मी निषेधाचा ठराव मांडतो.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १८४ चे वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेबांनी, आपल्याला चांगला पायंडा पाडलेला आहे. आपल्या मा. स्थायी समितीमध्ये आणि मा. महासभेमध्ये जे विषय निघतात. जे सन्मा. सदस्य बोलतात आणि जे विषय असतात त्या विषयाला अनुसरुन साहेबांनी संबंधित डिपार्टमेंटला आदेश दिलेले आहेत की, जी सदरहून बाब मा. स्थायी समितीमध्ये किंवा मा. महासभेमध्ये निघते आणि तुम्ही याबाबतीत पाठपुरावा करुन त्याची कारवाई करा. आणि इमिजिएटली त्याचा खुलासा करावा, असे मा. आयुक्त साहेबांनी संबंधीत खात्याला आदेश दिलेले आहेत. त्यामुळे मी मा. आयुक्त साहेबांचे अभिनंदन करतो. परंतु, साहेब आपण आदेश दिल्यानंतरसूद्धा कारवाई झाली नाही. जो नगरसेवक जो लोकप्रतिनिधि अनधिकृत बांधकामाला पाठिशी घालतो. त्याचे नगरसेवकपद रद्द होउ शकते आणि जो अधिकारी तुमचा आदेश एक्सेप्ट करत नाही आणि त्या अनधिकृत बांधकामाला चालना देतो म्हणजे त्याच्या कारवाई पाठिंबा देतो, अशावेळी मा. आयुक्तसाहेब तुम्ही काय कारवाई करणार?

**मा. आयुक्त सो. :-**

असे जो कोणी संबंधित अधिकारी असतील त्यांच्यावर नियमाप्रमाणे जी कारवाई करणे आवश्यक आहे ती आपण करणारच आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही जो आदेश दिला होता. मागच्या आपली स्थायी समिती सभा २४ तारखेला झाली होती. आणि तुम्ही इमिजिएटली संबंधीत डिपार्टमेंट सांगितले होते की, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत टपऱ्यांवर कारवाई करणेबाबत असे सांगितले होते. तुम्ही तो परवाना रद्दसुद्धा केला. संबंधित कर्मचऱ्यांना आदेशसुद्धा दिले. गेल्या वेळी स्थायी सभेतसुद्धा ही चर्चा झाली. परंतु, त्या कर्मचाऱ्यांनी अजिबात त्याच्यावर कारवाई केली नाही.

**मा. आयुक्त सो. :-**

कशाबद्दल?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, टपऱ्याबद्दल अजिबात कारवाई केली नाही. त्याला परवानासुद्धा रद्द केले. अतिक्रमण विभागातील इनचार्ज त्यांनी त्यांना सागितले की, संबंधितानी परवाना रद्द केलेले आहेत. तेव्हा तुम्ही ताबडतोब ॲक्शन घ्या. परंतु, त्या कर्मचाऱ्यांनी अजिबात ॲक्शन घेतलेली नाही. आज त्या गोष्टीला आठ दिवस होत आहे. साहेब, काय आहे तुम्ही जेवढी चांगली काम करतात. आणि तुमच्या खालचे अधिकारी आहेत ते तेवढे करत नाही. मग, प्रॉब्लेम होतो ना.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, तिकडे आपल्याला मेटल डिटेक्टर लावायचे होते. त्याची कुठपर्यंत पुर्तता झाली त्याचा जरा प्रशासनाने खुलासा केला तर बरे होईल. माझ्या माहितीप्रमाणे आपण निविदा काढलेल्या होत्या.

**मा. सभापती सो. :-**

ते टेंडर ओपन झालेले आहे, असे काहीतरी साहेब बोलत होते.

**संजय गोखले :-**

पुढच्या डिटेक्टरला लागलेले तुम्हाला दिसेल.

**शशिकांत भोईर :-**

तसेच, आपल्या तिकडे पंचिंग सिस्टिम होणार होती. आजपर्यंत ते कार्यान्वित होत नाही काय कारण आहे?

**संजय गोखले :-**

पंचिंग मशिन आठ दिवसात कार्यान्वित होईल.

**शशिकांत भोईर :-**

चालू होईल का?

**संजय गोखले :-**

चालू होईल. त्याची कार्यवाही पूर्ण होण्यासाठी आपल्याकडे सगळे फोटो आणि आयकार्डस आलेले आहेत.

**शशिकांत भोईर :-**

आठ दिवसात नक्की पुर्तता करा. कारण, एक मेसेज चांगला गेला पाहिजे की, आपण कामे केलेली आहे. निवीदा पास केलेल्या आहेत. पुर्तता होत नाही असे होता कामा नये.

**संजय गोखले :-**

कार्ड आलेली आहे. त्या कार्डाचे सॉर्टींग करुन आम्ही ते काम आठ दिवसात चालू करू.

**शशिकांत भोईर :-**

मेटल डिटेक्टर आणि पंचिंग कार्ड सिस्टिम सुरू होईल?

**संजय गोखले :-**

होय.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापती साहेबांना किती धन्यवाद द्यायचे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, डायऱ्या ज्या छापल्या आहेत त्यामध्ये काही चुका झालेल्या आहेत ते बाहेर आमच्या निदर्शनास आलेले आहे.

**मा. सभापती सो. :-**

बाहेर डायऱ्या अजून दिल्याच नाहीत तर चुका काय झालेल्या आहेत? त्या आम्हाला कशा समजतील?

**शशिकांत भोईर :-**

म्हणजे सिक्रेट ओपन कसे झाले?

**रतन पाटील :-**

अहवालसुद्धा मागच्या वेळेला फुटला गेलेला होता.

**जेन्वी अल्मेडा :-**

डायऱ्या अजून आपल्या हाती लागलेले नाही. ओपन झालेल्या नाही. आणि त्याच्याआधी चुका आहेत असे सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब सांगतात हे योग्य नाही.

**मा. सभापती सो. :-**

प्रथम डायऱ्या आणा.

**रतन पाटील :-**

विषय झाल्यानंतरच डायऱ्या येउु द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

टेंडर मंजुरी झाल्यानंतरच डायऱ्या देउु द्या

**जेन्वी अल्मेडा :-**

पहिले विषय होउु द्या. नंतर डायऱ्या वाटप करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. नगरसचिव साहेब, टेंडर मंजूरीसाठी कशाला आणता?

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहेब, तुम्ही एवढी घाई का करता?

**शशिकांत भोईर :-**

मा. आयुक्त साहेब, आपण गेल्या वेळी सन २००५-२००६ चा जो अहवाल दिला ते पेपरमध्ये आले होते आणि आपण हक्कभंगाची कारवाई करणार होते त्याचे काय झाले?

**मा. आयुक्त सो. :-**

हक्कभंगाची कारवाई करणे आवश्यक नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हक्कभंग कसा होउु शकतो?

**शशिकांत भोईर :-**

माझी मा. सभापतीसाहेबांना विनंती आहे की, आता जो सन २००५-२००६ चा अहवाल आहे त्यावर चर्चा झाली तर चांगले होईल.

**मा. सभापती सो. :-**

थोडीशीच चर्चा करा.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, कारण आम्ही ह्या अहवालाचे वाचन केले आम्हाला त्यात काही त्रुटी आढळल्या ते आपल्या निदर्शनास आणू इच्छितो आणि त्यावर कारवाई तर प्रशासनालाच करायची आहे. आपल्याला करायची नाही. आपण मंजुरी देउु ना. आपण मंजुरी देणार नाही असे आपण बोलत नाही. मंजुरी देतो.

**मा. सभापती सो. :-**

थोडक्यात चर्चा केली तर बरे होईल असे मी म्हणतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दहा मिनिटे ठेवा.

**रोहिदास पाटील :-**

अहवालाच्या चर्चेसाठी अर्धातास ठेवा. ते काम आहे. आणि कोणावर टिका - टिप्पणी करायची आहे ते नियमानुसार केली पाहिजे.

**मा. सभापती सो. :-**

मी काय म्हणतो आपण चर्चा नंतर करुया.

**रतन पाटील :-**

साहेब, ठराव तर पास करायचा आहे.

**मा. सभापती सो. :-**

मग, आपण नंतर चर्चा करुया. मी तुम्हाला त्यासाठी नंतर दहा मिनिटे देतो.

**शशिकांत भोईर :-**

आपल्याला ठरावामध्ये जो काही त्रुटी असेल आपण तो दाखवू शकतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही जी चर्चा करणार आहात तोच ठराव मी मांडणार आहे. तुम्ही त्या ठरावाचा तात्काळ इमप्लिमेन्टेशन करावे.

**रतन पाटील :-**

साहेब हा लेखा परिक्षण अहवालाचा विषय जो आलेला आहे. आपण प्रत्येक वेळेला ऑडिट १०० टक्के म्हणुन करतो.......

**मा. सभापती सो. :-**

तुम्हाला मी बोलायला ३ मिनिटाचा अवधी देतो.

**रतन पाटील :-**

साहेब, कमीत कमी दहा मिनिटे देतो.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, त्यांना दहा मिनिटे निट बोलायला द्या. त्यांना मुद्देसुद बोलत जाउ दे.

**रतन पाटील :-**

आम्हांला बोलायला अर्धा तास तरी द्या.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब तूम्ही बोला.

**रतन पाटील :-**

आपण ज्यावेळी १०० टक्के ऑडिट करतो. त्यावेळी असे आक्षेप यायलाच नाही पाहिजे. सेन्ट्रल ऑडिटमध्ये ज्यावेळी आक्षेप येतात त्यावेळी खेदाची बाब आहे. जेव्हा महापालिका १०० टक्के ऑडिट करते हे योग्य नाही. ह्याच्यानंतर ज्या ऑडिट होईल त्यावेळी त्यात काही आक्षेप असतील किंवा काही त्रुटी असतील त्याच वेळी ते पुर्ण करण्यात म्हणजे असे आक्षेप परत येणार नाही. आता तुम्ही जे अहवाल दिलेला आहे. त्यामध्ये तुम्ही बघा. मी प्रत्येक पान नंबर घेतो. पान नंबर ३ मध्ये लेखापरिक्षणाच्या कालावधीत एकुण मंजुर पदापैकी ३० पदे भरलेली असुन २२ पदे रिक्त आहेत. ती अजुन कुठली पदे रिक्त आहेत. जर खरोखरच असतील तर ती त्वरित भरुन काढावित. पान नंबर ४ मध्ये, सन २००३ - २००५, सन २००४ त्याचे आक्षेप संख्या १० दिलेली होती. सन २००४ - २००५ मध्ये ती संख्या ६१ दिलेली आहे. पान नंबर ५ मध्ये याच्यात सदरचा दिलेला आहे. सदरच्या लेखापरिक्षणाखालील गंभीर आक्षेप निदर्शनास आले आहेत. गंभीर हा शब्द महापालिकेच्या वतीने फार मोठा वाटतोय. गंभीर म्हणजे ह्याच्यामध्ये भंयका उलाढाली आहेत. आणि त्या पुर्ण करण्याची जबाबदारी सभागृहाकडे मा. आयुक्त आणि मा. सभापती साहेबाकडे आहे. आपण तो विषय घेणारच आहोत. पान क्रमांक ६ मध्ये महापालिकेतील अतिक्रमण विभागाकडुन सन १९९६ ते सन २००६ पर्यंत तोडण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामाचा खर्च संबंधिताकडुन वसुल करण्यात आलेला नाही. सन १९९६ पासुन सन २००६ पर्यंत जेवढी अतिक्रमण झाली त्यावर त्याप्रमाणे कारवाई झाली. त्यावेळी जो खर्च महापालिकेने संबंधित ज्यांचा अनधिकृत कारवाई झाली त्यांच्याकडुन तो खर्च वसुल करायचा आहे तो अजून वसुल केलेला नाही आणि इथे कोठे दाखवलेलाही नाही. वसुल का केले नाही? साहेब, वसुली सन १९९६ पासुन ची आहे. आता वसुल होणार आहे का? नसेल तर तसे सांगा. आपण त्यावर सुध्दा चर्चा करु त्याला जबाबदार कोण आहे? त्या - त्या वेळेला  वसुली झाली नाही तर संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल. प्रत्येक वेळेला किती अतिक्रमण तोडली गेली? सन १९९६ पासुन १९९७,१९९८ पासुन २००६ पर्यंतचा जो कालावधी त्यामध्ये किती अतिक्रमण तोडली गेली त्याचा पुर्ण अहवाल सादर करावा लागेल. इतकी अतिक्रमण तोडली गेली, इतकी करवाई केली आणि इतके पैसे वसुल केले त्याच बरोबर नगर रचना विभागाकडुन विकास कामाची वसुली अपेक्षित उत्पन्नाच्य तुलनेत ३४.६० म्हणजेच, ४ कोटी १५ लाख २०

हजार रु. ने कमी झालेली आहे. आपण ज्यावेळी उत्पन्न ठरवतो त्यावेळेला उत्पन्न वाढायला पाहिजे. त्यावेळी उत्पन्नाचा वसुली का झालेली नाही. ह्यावरसुध्दा लक्ष केंद्रित करायला पाहिजे. महापालिकेचे उत्पन्न जास्तीत जास्त वाढले पाहिजे. त्याच्यामुळे विकास कामाला गती येईल. ते कशासाठी वाढले नाही. त्याच्यावर लक्ष केंद्रीत करणे गरजेचे आहे. आरोग्य विभागाचा आस्थापनेवर असलेला ८१४ स्थायी सफाई कामगारापैकी फक्त २८७ सफाई कामगार प्रत्यक्ष आरोग्य विभागाला काम करित असल्याने ५२७ सफाई कामगार खाजगीकरणातुन घ्यावे लागत असल्याने त्याच्या वेतनावर महानगरपालिकेने सन २००५ , सन २००६ या आर्थीक वर्षात २ कोटी ६२ लाख ११ हजार ५०४ रु. एवढा खर्च केलेला आहे. ही मोठी आक्षेपार्ह अशी गोष्ट आहे. ज्यावेळी आपल्याकडे सफाई कामगार आहे. आपण ५२७ सफाई कामगार आणखी बाहेरुन अस्थायी कामगार घेतो. आणि आपण साफ-सफाईचे आणि अन्य फवारणीचे ठेके दिले असतानासुध्दा महानगरपालिकेने ५२७ सफाई कामगार जास्त धेतले आहेत. तर ही फार मोठी आक्षेपार्ह गोष्ट आहे. त्याचा महापालिकेच्या उत्पन्नावर किंवा आर्थिक बजेटवर जास्त खर्च होत आहे. २ कोटी ६२ लाख रु. खर्च होतोय. तर, हयावर सुध्दा सुधारणा व्हायला पाहिजे. महानगरपालिकेचा खर्च कसा कमीत कमी करता येईल, कसा कमीत कमी होईल हयाच्यावर सुध्दा लक्ष केंद्रित करायला पाहिजे. सन १९९४ पासुन सन २००५-२००६ पर्यंत शाळा भाडे रक्कम ४ कोटी ५७ लाख १५ हजार १७६ रु. वसुली झालेली नाही. वसुली का झाली नाही? ब-याचवेळा ही चर्चा मा. स्थायी समितीच्या बजेटच्या मिटींगमध्ये आणि मा. महासभेमध्येसुद्धा आलेला होता. मग वसूली का झाली नाही? रु. ४ कोटी मध्ये हा विषय लहानात लहान संख्या नाही. मा. आयुक्त साहेब, शिक्षण विभागाचे कोण असतील तर त्यांनी खुलासा करावा. त्यासाठी ४ कोटी रु. भरपूर आहेत. आपली छोटीशी आणि गरीब महानगरपालिका आहे. उत्पन्न जरी फूगीर दाखवले तरी आपली महानगरपालिका गरीब आहे. ''ड'' की ''ढ'' हे ठरवायचे आहे.

**शशिकांत भोईर :-**

'ड' महानगरपालिका आहे.

**रतन पाटील :-**

तर हे रु. ४ कोटी ५७ लाख वसूल करण्यासाठी कुठली उपाययोजना करायला पाहिजे? आणि लवकरात लवकर महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये कसे ते जमा होतील? त्यासाठी त्वरीत त्याचे प्रयोजन व्हावे. पान क्रमांक ९ मध्ये सन २००५-२००६ या वित्तीय वर्षात अतिक्रमण विभागाने महानगरपालिका क्षेत्रातील १३९ अनधिकृत बांधकामाची निष्कांचित केली व गाळे, घरे झोपडया पत्रासहित कुंपण भिंत इ. १०६८ अतिक्रमण बांधकामे निष्कांचित केलेली आहेत. अशी एकूण १२०७ अनधिकृत बांधकामे निष्कामे केलेली आहे. सन १९९६-२००६ पर्यंत रु. १८ हजार १३ साहेब, आपण येथे संख्या दिलेली आहे. रु. १८ हजार निष्कामे केलेली आहे त्याचा खर्च वसूल करण्यात यावा. पान क्र. ११, नगररचना विभाग महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना विभागाने अर्थसंकल्प विकास आकार रक्कम वसूली या शिर्षाखाली १२ कोटी रु. वसूल करणे हे प्रस्तावित केले होते. त्या अनुषंगाने नगररचना विभागाने या वित्तीय वर्षात विकास शुल्क रु. ७ कोटी ८४ लाख इतकी वसूली झालेली आहे. बाकीची वसूली बाकी आहे. ती लवकरात लवकर वसूल करण्यात यावी व महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर करावी. पान क्र. १३, बँक खाते- ह्यामध्ये तुम्ही बघा की किती ताळमेळ आहे. ठाणे जिल्हा-१, ठाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये रु. ६१ कोटी ७० लाख ही सर्वसाधारण रोख वही प्रमाणे शिल्लक आहे आणि बँक विवरणपत्राप्रमाणे रु. १ कोटी ६९ हजार ०६० अशा पद्धतीने बँकेचे लेखे दिलेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील साहेब, तुम्ही आम्हाला सगळे वाचून दाखवले. ह्यावर लेखा परिक्षकानेच असे निवेदन करावे की, ह्यांनी ह्यामध्ये काय दाखवले, त्यांना काय दिसून आले नि आम्हाला नीट समजत नाही. आमच्यातील सद्सदविवेकबुध्दीला काय पटले, आपण वाचले काही विशेष नाही. आपण हे आकडेमोड वाचायला पाहिजे होतेच.

**रतन पाटील :-**

आकडेमोड ती बँकेचा दाखला होता.

**रोहिदास पाटील :-**

त्यांना काय म्हणायचे आहे की, एकदा नीट निवेदन होऊ दे. आम्ही त्याच्यासाठी सेप्रेट परवानगी देत नाही.

**मा. सभापती सो. :-**

दहा मिनिटे झाली आहेत.

**रोहिदास पाटील :-**

म्हणून हा चर्चेचा विषय आहे. ह्या विषयावर आपण चांगले बोलतो. ह्यावर सर्वसाधारण रोख रक्कम शिल्लक, बँक विवरण पत्रे सुद्धा शिल्लक असे नमुद केलेले आहे. ह्या एवढया तफावतीचे रकमा आलेल्या आहे. ह्यात खरोखर कामकाजाबद्दल बोलायचे आहे का, ते आम्हांला समजू द्या ना. तुम्हांला काय बोलायचे

आहे, याचा अर्थ कसा निघतो. रोख वही म्हणजे काय? बँक विवरण पत्र म्हणजे काय? आपण एवढयावरच बोलू ना. म्हणजे पान नं. १३ पासूनचे आपण बोलू या.

**सुरेश बनसोडे (मुख्य लेखापरिक्षक) :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो की, लेखा विभागाद्वारे जे काही चेक दिले जातात. सर्वसाधारण असे असते की, तुमची कॅशबुक आणि पासबुक टॅली व्हायला हवेत. कॅशबुक आणि पासबुक ची टॅली आपण त्याच दिवशी संबंधित अधिकाराने फायनल करायला पाहिजे. त्या त्या अधिकाराने फायनल केल्यावर काय होते की, तुम्ही काही देयक दिलेले असतात. काही चेक दिलेले असतात. त्या चेकच्या इन्ट्रीज दिसत नाही. मग चेकच्या इन्ट्रीज जर बँकेतून क्लिअर झाल्या नाहीत तर दोन्हींमध्ये तफावत येऊ शकते. खरे तर हा तांत्रिक मुद्दा आहे. तांत्रिक मुद्दयामध्ये जी देयक पारित झालेले असतात. मुव्हमेंट मध्ये असतात. म्हणजे आपल्याला ती अमाऊंट बँकेतून कमी झालेली दिसते. पण, आपल्याकडे दिसत नाही. असा तांत्रिक मुद्दा असल्यामुळे त्या तांत्रिक मुद्दयाचे निराकरण किंवा बँक रिकन्सलेशन वेळेवर झाले. आणि दिवसादिवसाला आपले बँक अमाउँट रोजचे क्लिअर झाले. तरी तुट दिसणार नाही. तर एवढीच दक्षता लेखाविभागाने घ्यायची असते. तेवढीच माझी आहे.

**रोहिदास पाटील :-**

मी मा. लेखापरिक्षकाला सांगतो की, तुम्ही देना बँकेचे खाते दिलेले आहे. सर्वसाधारण रोख वही प्रमाणे शिल्लक रु. ५ हजार ९३० होतात आणि बँक विवरण पत्र प्रमाणित शिल्लक १ लाख ५८ हजार २४५ रु. झाले?

**सुरेश बनसोडे (मुख्य लेखापरिक्षक) :-**

आपण ज्यावेळेला चेक देतो. त्यावेळेला आपले इन्ट्रीज मायनस होत जातात.

**रोहिदास पाटील :-**

ज्यावेळेला तुम्ही हा अहवाल सादर केला, प्रिंट केला. त्या तारखेपासुनची आजची स्थिती काय आहे? असे जरी तुम्ही निवेदन केले तरी आम्ही समजुन घेउ तुम्ही हे जेव्हा प्रिंट केले म्हणजे तुम्ही प्रिंट करतेवेळी संबधित खात्याचे काय मत घेतले होते, त्यांना काही निर्देश दिले होते. त्यांनी तसे इक्ज्युकेशन केले की, नाही केले. समजा याला म्हणतात की, अण्डरस्टँड मधली तफावत आहे. येथे क्लिअरन्स झाला नाही. आणि नंतर झाला. रोख वही प्रमाणित इतके पैसे झाले पण, कर्मचाऱ्यांनी आठ दिवस, दहा दिवस, महिना, दोन महिने चेक डिपॉझिटच केले नाही. म्हणुन तफावत आहे का?

**सुरेश बनसोडे (मुख्य लेखापरिक्षक) :-**

म्हणुन तफावत आहे.

**रोहिदास पाटील :-**

म्हणुन तफावत असेल तर ती आता क्लिअर झाली का? जर ती क्लिअर झाली असेल तर तशी तफावत तुमच्या लक्षात आल्यानंतर त्या , डिपार्टमेन्टला त्या खात्याला , त्या बँक वहीला तुम्ही निर्देश दिले होते का?

**सुरेश बनसोडे (मुख्य लेखाधिकारी ) :-**

हो.

**रोहिदास पाटील :-**

मग आजची पोझिशन काय आहे? मी फक्त देना बँकेचे विचारत आहे आजची पोझिशन काय आहे? नीट टॅली झाली की नाही?

**सुरेश बनसोडे (मुख्य लेखाधिकारी ) :-**

मला वाटते की, ह्याचे उत्तर अकाउन्टन्ट देतील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ऑडिटर साहेब, तुम्ही बँक रिकन्सलेशन केले का?

**सुरेश बनसोडे :-**

बँक रिकन्सेलेशन करणे ही लेखा विभागाची जबाबदारी आहे. साहेब, आपण त्रुटी दूर करु शकतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मग, तुम्ही त्यांना चेक केले का? असे विचारलेले होते का?

**सुरेश बनसोडे (मुख्य लेखापरिक्षक) :-**

त्यांनी मी विचारले त्यांच्या ज्या काही एन्ट्रीज होतात त्यांची जी काही बुक्स माझ्याकडे तपासायला येतात. ती सगळी बुक्स मी तपासलेली आहेत. त्यावर माझे अहवाल काढले. त्यानंतर मी जेव्हा त्यांना हाफ मार्जिन दिली. तेव्हा त्यांनी कोटिशियन ग्राफर करुन सबमिट केले असते. ते त्या अहवालात नमुद केलेले असते. आपण हा जो अहवाल देतो हा अहवाल अजूनही ग्राह्य झालेला नाही. जर या प्रत्येक विभागाने उत्तरे दिली. आणि ह्याचे निराकारण झालेले नसेल तर त्याचे निराकारण होऊ शकते. हा अहवाल फिक्स ॲण्ड

फायनल नाही. हा अहवाल मा. स्थायी समितीला सादर करुन त्रुटी शोधण्याचा एक प्रयत्न केलेला आहे. ह्याची उत्तरे प्राप्त झाली तर ती त्या अहवालामध्ये जातील.

**रोहिदास पाटील :-**

आपल्या प्रयत्नाबद्दल धन्यवाद आहे. आपण हे सभागृहासमोर आणले त्याबद्दलही धन्यवाद. आता ओबीसी बँकेचे आहे की सरळसरळ रोख वही मध्ये त्याची रु. ११ लाख १५ हजार १२० नोंद आहे. बँक विवरणपत्र रु. ७ लाख ७० हजार १८८ आहे. मग, मी तुम्हाला विचारतो तुम्ही उत्तर द्या पैशामध्ये तफावत कशी आली?

**सुरेश बनसोडे (मुख्य लेखापरिक्षक) :-**

बँक रिकन्सलेशन वेळच्या वेळी होत नाही. ते ह्यामागचे प्रमुख कारण आहे. ते रिकन्सलेशन जर व्यवस्थित झाले आपण दिलेले चेक आणि आपल्याला असलेले दायित्व ह्याची योग्य नोंदणी झाली तर असा प्रश्न निर्माण होणार नाही. हा एक तांत्रिक मुद्दा आहे.

**रतन पाटील :-**

ही छोटी अमाऊंट नाही. छोटी अमाऊंट कशाला म्हणतात. दोन - चार चेक आले आणि रिटर्न गेले तर प्रश्न येत नाही. परंतु हे चेक लाखो - करोडो रुपयांमध्ये दिलेले आहेत. साहेब आता तुम्हीच ते सांगितलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा सदस्यांनी या ठिकाणी लेखापरिक्षण अहवालावर बरीच चर्चा केलेली आहे. आपल्या महापालिकेच्या कायद्याप्रमाणे लेखापरिक्षण अहवाल हा मा. स्थायी समितीला सादर करणे आवश्यक आहे, बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या मुख्य लेखापरिक्षकांनी जो अहवाल तयार केलेला आहे तो आपल्या मा. स्थायी समितीसमोर सादर करण्यात आलेला आहे. हा अहवाल सादर करित असतान आणि केल्यानंतर प्रत्येक विभागाला जेव्हा लेखापरिक्षण केले जाते तेव्हा एक हाफ मार्जिन मेमो असतो. की, एखादा जो आक्षेप असेल तो आक्षेप त्या संबंधित डिपार्टमेन्टला पाठवला जातो आणि जर त्याची पुर्तता त्याचवेळी, त्याचक्षणी झाली तर तो आक्षेप घेतला जात नाही. परंतु, त्याची पुर्तता त्यावेळी झाली नाही म्हणुन अशाप्रकारचे आक्षेप घेण्यात आलेले आहेत. आपल्यासमोर हा जो अहवाल सादर केलेला आहे, त्या अहवालावरती आपण संबंधित विभागाला ह्याचे जे सगळे मुद्दे आहेत ते मुद्दे आपण त्यांना पाठवणार आहोत आणि आपण त्यांच्याकडुन त्याची परिपुर्तता करणार आहोत. आतापर्यंत महापालिकेचे जे ऑडिट झालेले आहे. मग ते बाहेरच्या अधिकां-यानी केलेले असेल किंवा महापालिकेच्या अधिका-यांनी केलेले असेल अशा प्रकारची अहवाल सतत मा. स्थायी समितीसमोर येत नाही. पहिल्यांदाच जेव्हा तो प्राप्त होतो तेव्हाच आशा प्रकारचा अहवाल हा मा. स्थायी समितीसमोर येतो. मा. स्थायी समितीला या बाबतीमध्ये मी आश्वासन देऊ इच्छितो की, लेखा परिक्षण अहवाल जे बाहेरचे आधिकारी करतात किंवा आपल्या महापालिकेचे अधिकारी करतात. त्याची पुर्तता संबंधित विभागाने केलेली आहे किंवा नाही. ह्याबाबतीत महिन्यातुन एकदा अहवाल हा जो काही पुर्तता झाली असेल त्या पुर्तते सह प्रत्येक महिन्याच्या एक तारखेनंतरच्या मा. स्थायी समितीला अशा प्रकारचा अहवाल सादर केला जाईल. आणि त्याच्यातुन आपल्याला कळेल की एकुण आक्षेप किती होते,त्याची पुर्तता किती झाली आणि कोणी पुर्तता ती पुर्तता न करण्याची कारणे काय आहेत आणि जेणेकरुन प्रशासनाची जी कोणी पुर्तता केली नाही आणि ती पुर्तता न करण्याची कारणे काय आहेत म्हणजे, अप्रत्यक्षपणे आपल्याही हे सगळे लक्षात येईल आणि जेणेकरुन प्रशासनाची जी कोणी संबंधित विभागप्रमुख असतील त्यांनाही कुठेतरी असेच वाटेल आतापर्यंत कसे आहे की, जवळजवळ सन १९९३ साला पासुनची आक्षेप आपल्याकडे पेंडिग आहेत. सन १९९३ साला पासुनचे ते आतापर्यंतची पुर्तता झालेली नाही. खरे म्हणजे, प्रत्येक वर्षी अशा प्रकारचे आक्षेपाची पुर्तता होणे आवश्यक आहे. अशा प्रकारचा एखादा आक्षेप घेतला की, तो त्या संबंधित विभागाकडे गेल्यानंतर त्याची लगेच पुर्तता करणे आवश्यक आहे किंवा होणे आवश्यक आहे. परंतु, असे होत नाही. आपण जर लेखा-परिक्षणाचा अहवाल पाहिला तर जवळजवळ सन १९९३ सालापासूनचे आक्षेप आजही आपल्याकडे पेंडींग आहे. आणि आपल्याला त्या सगळ्यांची पुर्तता करायची आहे. आपल्याला मा. स्थायी समितीच्या समोर जेव्हा अशा प्रकारचे महिन्यातून एकदा जरी पुर्तता अहवाल आता तरी आपण सुद्धा अशा प्रकारचे विचारु शकता की ज्यांनी पुर्तता अहवाल कुठल्या गोष्टींचा आक्षेपांचा केलेलाच नाही, अशांना सुद्धा आपण त्या ठिकाणी जाब विचारु शकतो की, जेणेकरुन ह्या लेखापरिक्षण अहवालामध्ये ज्या त्रुटी आहेत आपल्याला त्या त्रुटी दूर करुन प्रशासनाला एक चांगल्या प्रकारची गती येईल आणि ज्या काही चुका होतात व त्या वारंवार होणाच्या चुका टळल्या जातील.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, आम्ही तेच विचारतो की हा अहवाल मा. स्थायी समितीसमोर कोणत्या तारखेला, कोणत्या मिटींगमध्ये दिला होता?

**मा. आयुक्त :-**

२४ जानेवारीला मिटींगमध्ये हा अहवाल दिला होता.

**रोहिदास पाटील :-**

आज तारीख किती आहे? तीन तारिख आहे. आम्ही तेच विचारतो की, हा अहवाल सन २००५-२००६ चा अहवाल आहे. त्यांच्यानंतर आमच्या ज्यावेळी लक्षात आले लेखापरिक्षकाने त्या डिपार्टमेन्टला जेव्हा सुचना केली. हे छापतेवेळी सांगितलेले होते ना. त्या डिपार्टमेन्टकडून त्याच्यावर कारवाई झाली की नाही, हा एवढा डिफरन्स नाही. आता तुम्ही दुसरा विषय घ्या. मुदतठेवीचा विषय घ्या. रोख वही प्रमाणे रु. ११ लाख ६५ हजार ४५० शिल्लक जर रोख ठेव ठेवली. बँक विवरण पत्राप्रमाणे शिल्लकच नाही. १ रु. सुद्धा नाही. म्हणजे बँक विवरण पत्र आले नाही की ते लेखापालाकडेच पैसे आहेत आपण ह्याचा अर्थ काय समजायचा? म्हणून मी त्यांना सांगितले की, तुम्ही हे जे सांगता ते आम्हांला आमच्या भाषेत पटेल असे सांगा. की जेणेकरुन आम्हाला समजेल. आज आम्ही सांगतो की, रु. ११ लाख कुठे आहेत? ही टिपण्णी अशी दाखवते की, रु. ११ लाख कुठे आहेत?

**सुरेश बनसोडे (मुख्य लेखापरिक्षक) :-**

स्टेटमेंटमध्ये येत नाही.

**रोहिदास पाटील :-**

ते कशात देणार? म्हणून आम्ही तुम्हाला विचारतो. आम्ही कोणताही आरोप करत नाही. पाहिजे तर पहिल्यावरच बोला. तुमच्या ओ.बी.सी बँकेचे बोला. आणि देना बँकबद्दल बोला.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, हा जो अहवाल आहे. आपण हा अहवाल आज स्विकारतोय.

**रोहिदास पाटील :-**

आज स्विकारत आहे?

**मा. आयुक्त :-**

आज स्विकारत आहे.

**रोहिदास पाटील :-**

ह्यावर परत चर्चा करायची का?

**मा. आयुक्त :-**

तुम्ही ही चर्चा परत करा ना. मघाशी मी तुम्हाला हेच सांगितले की प्रत्येक महिन्याला या बाबतीत जर अशा प्रकारचा आढावा घेतला तर योग्य राहिलं.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही पुढच्या मिटींगला ह्यावर मुद्दा घेऊ.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील साहेब, पुढच्या मिटींगला नाही. मघाशी म्हणालो त्याप्रमाणे की १ तारखेनंतर होणाऱ्या मा. स्थायी समितीमध्ये प्रत्येक महिन्याला अशा प्रकारचे पुर्तता अहवाल सादर होणे आवश्यक आहे. याप्रमाणे, आपण संबंधित विभागाना सुचना देऊ की, जेणेकरुन त्याची पुर्तता होईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मी ठराव मांडतो. तुम्हाला यात जे काही करेक्शन करायचे ते करुन घ्या.

**शशिकांत भोईर :-**

मलासुध्दा बोलायचे आहे. त्यांची चर्चा झालेली आहे. मलासुध्दा चर्चा करायची आहे. मी नंतर कधी बोलणार.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहेब, हे तुमच्या फायद्याचे नसेल तरी महापालिकेच्या फायद्याचे आहे हे लक्षात घेऊन बोला.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मी महापालिकेच्या फायद्यासाठीच ठराव मांडत आहे ना. त्यांच्या फायद्यासाठी ठराव मांडत नाही. मी काय ठराव मांडतो हे तर बघा.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, मलासुध्दा चर्चा करायची आहे. मी सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब यांच्या चर्चेमध्ये इंटरफेयर केले नाही. मलासुध्दा त्यावर चर्चा करायची आहे.

**एस. ए. खान :-**

तुम्ही चर्चा करा. चर्चेत काय बोलायचे आहे ते बोला.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब, आपली चर्चा झाली आहे का? जशी पाने येतील तसे मलासुध्दा बोलू द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब, मी ठराव मांडतो. तुम्हाला वाटेल तर त्यामध्ये करेक्शन करा.

(सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. १८४ च्या ठरावाचे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

दोन महिन्यामध्ये संबंधित आक्षेपाचे निराकरण व वसुली होउुन २ महिन्यामध्ये त्याचा अहवाल मा. स्थायी समितीपर्यंत पुन्हा सादर केला जावा. अशाप्रकारची ठरावामध्ये सुचना ॲड होणे आवश्यक आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

एक महिना की दोन महिन्यामध्ये सादर करावा.

**मा. सभापती सो. :-**

एक महिन्यामध्ये सादर करावा.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब, सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहेब आपला ठराव मांडत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तसेच गॅझेट मा. स्थायी समितीत १ महिन्याच्या आत कळवावे. असा मी ठराव मांडत आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, मला सुद्धा बोलू द्या.

**जेन्वी अल्मेडा :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शशिकांत भोईर :-**

त्यांनी या ठरावाला अनुमोदन दिले ना. या मंजुरीला माझीसुद्धा मान्यता आहे. पण, तत्पुर्वी मी मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो. साहेब, पहिले कडू बोललेले बरे नंतर आपण गोड बोलू शकतो. आमच्या ऑडिटर साहेबांनाही बोलतो की मी पहिले कडू बोलेन. तुमच्या या ज्या त्रुटी होत्या. आज आपण सन १९९६ पासुन ते सन २००६ पर्यंत घेतोय. तसेच, आपल्याकडे या अगोदरसुद्धा ऑडिटर्स आले होते. मग, त्यांनी का काढले नाही. याच ऑडिटरसाहेबांनी का काढले? यांनाच फक्त फायदा करायचा होता? आगोदरच्या ऑडिटरना फायदा करायचा नव्हता. फक्त ते आपले तीन वर्षाचे कसेही प्रतिनियुक्तीवर आलेले अधिकारी आहेत. ते तीन वर्ष कधी संपतात आणि एक वर्ष कसे वाढवून देतात. असे बघून आपण पुढे जातो का? तर याचे पहिले प्रशासनाने खुलासा केला पाहिजे. त्यावेळेस त्यांचे कर्तव्य नव्हते का? ह्यावर प्रशासनाने खुलासा करावा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे, त्यासंदर्भामध्ये मी सन्मा. सदस्यांना सांगू इच्छितो की, कायद्यातील तरतुदीप्रमाणे प्रत्येक वर्षाचा अहवाल हा सक्षम प्राधिकरणाकडे म्हणजे, मा. स्थायी समितीला सादर केलेला आहे. आणि ह्याच्यापुढेही सादर होणार आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, बरोबर आहे. तरीसुद्धा आपल्याकडे सन १९९६ पासून ते आजपर्यंतचे आक्षेप आहेत ना. दरवर्षी केले तर मग, त्याच्यावर त्यांनी कारवाई काय केली? त्यांनाही आपण असे करुन दिला असेल. मग, मी त्यांची पुढची पुर्तता काय केली?

**मा. आयुक्त :-**

आतापर्यंत तो ठराव सन १९९६ पासूनचे जे आक्षेप प्रलंबित आहेत तो विचार मनामध्ये ठेवूनच मगाशी मी आपल्याला निवेदन केले की, अशाबाबतीमध्ये तर समजा, एक तारखेनंतर होणाऱ्या प्रत्येक स्थायी समितीला आपल्यासमोर अनुपालन अहवाल सादर केला. आणि जे अहवाल सादर करणारे नाहीत अशा विभागांना जाब विचारु शकतो की, त्यांनी का केले नाही? ह्यामध्ये एक लेखापरिक्षण अहवालाचा निपटारा लवकर होईल अणि संबंधीत जे विभागप्रमुख असतील त्यांना कुठेतरी अशी भीती वाटेल की तर आपण हे काम केले नाही तर आपल्याला मा. स्थायी समितीला त्याठिकाणी त्याचे उत्तर द्यावे लागेल.

**शशिकांत भोईर :-**

त्यांनी पत्राद्वारे संबंधीत विभागाला कळवले नव्हते का?

**मा. आयुक्त :-**

सन १९९६ पासुन आतापर्यंत का केले नाही ह्यांचे उत्तर त्यांना द्यावे लागेल.

**शशिकांत भोईर :-**

जेव्हा आक्षेप आलेले होते आणि आपले सेंट्रल ऑडिट झाले, लोकल ऑडिट झाले होते. त्यावेळी आक्षेप आलेले होते. तेव्हा संबंधित विभागंना कळवायला पाहिजे होते की, तुमची काय पुर्तता आहे ते त्यावेळी करायला पाहिजे होतॆ त्यावेळी ती लोक त्यांना स्टॅंप देत होते.

**मा. आयुक्त :-**

माझ्या माहितीप्रमाणे, जेव्हा लेखापरिक्षण होते तेव्हा मा. स्थायी समितीला सादर झाल्यानंतर आपण प्रत्येक विभागाला पाठवतो आणि त्याची पुर्तता त्या संबंधित विभागाने करायची असते.

**शशिकांत भोईर :-**

म्हणजे याचा अर्थ असा की, संबंधित विभागाने त्याच्यावर चालढकल केली असे तुमचे म्हणणे आहे का?

**मा. आयुक्त :-**

बरोबर आहे. तसेच म्हणावे लागेल.

**शशिकांत भोईर :-**

मग, याला जबाबदार कोण आहे? मा. आयुक्त साहेब की तत्कालीन मुख्यलेखाधिकारी होते ते जबाबदार आहे.

**मा. आयुक्त :-**

याला जबाबदार कोण आहे? त्यापेक्षा त्याचा निपटारा कसे होईल हे बघायला पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, नाही. त्याला जबाबदार पाहिजे. साहेब, आपण सक्षम अधिकारी म्हणून मा. आयुक्त म्हणून आलात. मग, तुमच्या कार्यालयामध्ये जर असा अहवाल येत असेल तर तुम्ही त्यावर बोलले की आक्षेपाचे निराकरण करण्यासाठी दर महिन्याच्या पहिल्या तारखेला असे अहवाल येतील. मग, तात्कालीन मा. आयुक्त साहेब होते किंवा मा. मुख्याधिकारी होते त्यांनी तसे का केले नाही?

**मा. आयुक्त :-**

त्यांनी का केले नाही त्याची कारणे मी  कसे सांगणार? मी सांगू शकत नाही.

**जेन्वी अल्मेडा :-**

ते त्यांचे काम होते ते करायला पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

त्यांचे ते काम होते. त्यावेळी मुख्य लेखापरिक्षक आले होते. त्यांनी संबंधीत विभागाशी पत्रव्यवहार करुन तुम्ही आक्षेप पुर्ण करा. असे सांगायला पाहिजे होत. परंतु, संबंधित विभागाला धरेलच नाही, ते त्याच्या जोडिला गेलेच नाही. तुमच्या चुका त्या तुम्ही सुधारा असे म्हटले नाही त्यांना पाहिजे विश्वासात घेणे गरजेचे होते.

**रोहिदास पाटील :-**

सहाय्यक साहेबांनी परिषदेच्या वेळी फार मोठी आक्षेप घेवुन तो अहवाल दिला होता. त्यात अमुक-अमुक त्रुटी आहेत त्यामध्ये जवळ जवळ सगळेच अधिकारी बाधित होते म्हणा दोषी होते म्हणा. तर त्यांच्यावरही कारवाई झाली नाही ही सभा तुमच्याकडे अपेक्षा करते की, आम्ही जो एक महिन्याची वेळ देतो. आणि नैतिक जबाबदारी पहिली तुमची आहे. असे आम्हाला वाटते की, त्यात जे कामकाज आहे त्या कामकाजाचे किती प्रमाणात पुर्तता होते आणि मग तुम्ही कोणावर कारवाई केली असे जर तुम्ही आम्हाला उत्तर दिले तर ते सोपे पडेल.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, आतापर्यंत जर कामे झालेली नाहीत ना तर आपण वेगळा त्याबाबत वेगळा पायंडा पाडलेला आहे की, जेणे करुन प्रशासनामध्ये गतीशीलता येईल. आपण त्याच दृष्टीकोनातुन विचार करु.

**शशिकांत भोईर :-**

मा. आयुक्त साहेब, त्यासाठी आमचे सहकार्य आहे. नाही असे आम्ही सांगत नाही. आम्ही हे पण किंतू परंतू कशाला विचारतो आहे. त्यांनी हे करणे गरजेचे होते.

**मा. सभापती सो. :-**

हे आक्षेप आपण प्रत्येक महिन्याला घेवु.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, मी तुम्हाला दाखवतो की, ह्याच्यामध्ये आक्षेप आलेले होते. एका उड्डाणपुलाची बँक गॅरेंटी होती. त्याचे काय झाले? बँक उड्डाणपुलाची गॅरेंटीबाबतचा आक्षेप आलाच नाही.

**मा. आयुक्त :-**

आता जे काही आक्षेप घेतलेले आसतील आपण त्याची पुर्तता करुया.

**शशिकांत भोईर :-**

जे आक्षेप आले आहेत तेसुद्धा ढोबळ आलेले आहेत. ह्यामध्ये पुर्ण नाही.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही आक्षेपाची संख्या सांगा ना. एकूण किती आक्षेप घेतली गेली आहेत?

**शशिकांत भोईर :-**

मा. मुख्य लेखापरिक्षकांनी याचा खुलासा केला पाहिजे.

**दिपक खांबित :-**

आमच्याकडे आक्षेप आलेले आहेत आणि ते आक्षेप नगरपालिकेच्या काळात घेतलेले आहेत. नगरपालिकेपासुनते आक्षेप पेन्डिग आहेत.

**शशिकांत भोईर :-**

परंतु, ह्याच्यामध्ये आक्षेप दिलेले आहेत.

**दिपक खांबित :-**

दोन - तीन आक्षेप आलेले आहेत. नगरपालिकेचे आक्षेप पेन्डिग आहेत. परंतु, ह्याच्यामध्ये जे ढोबळ आक्षेप होते. तेसुद्धा आलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

ह्याच्यामध्ये संख्या दिलेली आहे. वार्षिक लेखापरिक्षण अहवाल जो १०६(३) अन्वये झालेला आहे. त्याच्यामध्ये आक्षेप दिलेले आहेत. विशेष लेखापरिक्षण जो अहवाल त्याच्यामधील आक्षेप आहेत. त्याच्यानंतर स्थानिक निधी लेखा अहवाल जो दिलेला आहे. त्याच्यामध्ये आक्षेप आहे. त्यानंतर केंद्र सरकारचा तहा लेखापरिक्षण कार्यालयाचा लेखापरिक्षण अहवाल आहे. त्याच्यातलेसुद्धा आक्षेप आहे. म्हणजे, संपुर्ण आक्षेप याठिकाणी दिलेले आहेत.

**शशिकांत भोईर :-**

त्यामध्ये नंबर दिले आहेत का?

**मा. आयुक्त :-**

ह्याच्यामध्ये नंबर आहेत.

**शशिकांत भोईर :-**

पान क्र. ९ वर आपण ह्यात अतिक्रमण विभागाचा विकास कर दाखवलेला होता. आपण अतिक्रमण १८ हजार १३ तोडली. साहेब, ती वसुली केली नाही. वसुली केली नाही तर त्याला जबाबदार कोण आहे? संबंधित अधिकारी जबाबदार आहेत हे तर नक्कीच आहे. कारण, तसा आपला कायदा बोलतो, अधिनियमच बोलतो की, संबंधित अधिकारी जबाबदार आहेत. मग, आजपर्यंत असे अतिक्रमणावर एकुण खर्च झाला आहे? त्याच्या आक्षेपामध्ये कुठेच दाखवलेला नाही की एवढे करोडो रुपये येणे बाकी आहे की काय?

**रतन पाटील :-**

१८ हजार अतिक्रमणावर कारवाई झालेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

जर दिली नसेल तर माझी सभागृहाला विनंती आहे की, जर असे अतिक्रमण हटवले असतील आणि आपण वसुली केलेली नसेल तर संबंधित जे बिल्डर्स असतील त्यांच्यावर लॅण्ड रेव्हेन्यु कायदा कोड क्र. ११ च्या तरतुदीनुसार सदर जमितीच्या सातबारावर वसुलीच्या रकमेएवढा बोजा ठेवावा, असे मी सभागृहाला विनंती करतो.

**रतन पाटील :-**

आणि अधिकारी सुटले?

**शशिकांत भोईर :-**

अधिकारीसुद्धा येतील ना. नंतर अधिका-यांवरच बोजा ठेवायला पाहिजे. तसेच, नगररचना विभाग विकास आकाराची किती रक्कम वसुली करायची आहे? तर ह्यामध्ये तुम्ही दिलेले आहे. ते तुम्ही बघा. आपण १२ लाख रुपयाची तरतुद केलेली आहे. आणि ७ कोटी ८४ लाख रुपये इतकी वसुली केलेली आहे. म्हणजे आपल्याला ३५ टक्के येणे बाकी आहे. ज्यावेळेस आपण त्यांना विकास कर अंदाजे देतो....

**मा. आयुक्त :-**

आपण विकास कराच्या बाबतीत जे म्हणत आहात त्याप्रमाणे आपण विकास कर साधारण एक वर्षामध्ये किती मिळेल, याचा अंदाज करतो. त्याप्रमाणे प्रशासनाने मागच्या वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये जी काही आकडेवारी दिलेली असेल तर त्या फिगरचा विचार न करता मा. स्थायी समितीमध्ये आणि मा. महासभेमध्ये अशा प्रकार विकास करायचा जो निधी आहे तो.........

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही विकासकराबाबत बोलता परंतु तो विकास करता मुळ अंदाजपत्रकामधुन विकास कर वसुल करतो.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य मी राहिदास पाटील साहेब, इमारती पुर्ण झालेल्या आहेत. त्यांनी तुमची ओ. सी. घेतलेले आहे का? आपण ओ. सी. घेतांना काही कर घेतो त्यांनी तो कर भरलाच नाही. त्यांनी ओ. सी. ची

आवश्यकता उपभोगलेलीच नाही मी हे सुध्दा निर्दशनास आणुन देतो. ते २५ टक्के, ५० टक्के भरतात आणि त्यात नंतरचा विकास कर राहतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य मी शशिकांत भोईर साहेब, तुम्ही या अर्थसंकल्पामध्ये जो प्रस्ताव केलेला आहे. आपण त्याला ढोबळ म्हटलेले आहे. परंतु, आपण खरा प्रस्ताव केलेला नाही.

**रोहिदास पाटील :-**

विकास कर भरल्याशिवाय ओ. सी. देत नाही.

**शशिकांत भोईर :-**

काही बिल्डर्स ओ. सी घेतच नाही. सी. सी. घेउन बिल्डींग पुर्ण करतात.

**मा. आयुक्तः-**

ज्यांनी ओ. सी. घेतली नाही. त्यांच्यावर आपल्याला कारवाई करता येईल.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तुम्ही तशी संबधित करावाई करा.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही विकास करायचा जो आक्षेप वाचला आहे. त्या आक्षेपामध्ये ती रक्कम निश्चित केली जात नाही की, आपल्याला हा विकास कर एवढी एवढी वसुली करायची आहे. तसे त्याच्यामध्ये नसते. जसजसे आपल्याकडे बिल्डर्स येतात किंवा ज्यांनी प्रपोझल टाकलेले आहे. त्यांचे प्रपोझल मंजुर करताना आपण त्यांच्याकडुन विकास रक्कम घेतो. आपल्याला संबध वर्षामध्ये किती रक्कम घेतो.आपल्याला संबध वर्षामध्ये किती रक्कम मिळेल याचा आपण अंदाज करातो.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, मी तुमच्यशी सहमत आहे. परंतु आपण ज्या विकासकांना सी. सी. वगैरे देतो. तद्नंतर त्यांनी बिल्डींग पुर्ण केल्यानंतर ओ. सी. घ्यायला पाहिजे होती ते ओ. सी. घेतच नाही त्याच्यावर आपण काय करावाई करणार? जे संबधित आर्किटेक असतील त्यांच्यावर करवाई करणार की, नंतर बिल्डर्सनां नकाशे मजुर करणार नाही का?

**मा. आयुक्त :-**

जे बिल्डर्स ओ. सी घेत नाही. त्यांच्यावर आपण कारवाई करुन विकास कराची जी रक्कम आहे ते त्यांच्याकडून वसुल करु या. आणि त्यांच्यावर ओ. सी. घेणे हे कम्पल्सरी करु.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, एक अधिकृत माहिती द्या की विकास कर कधी वसुल करतात?

**मा. आयुक्त :-**

प्लॅन मंजुर करतेवेळी विकास कर वसुल करतात.

**रोहिदास पाटील :-**

प्लॅन मंजुर करतेवेळी विकास कर वसुल करतात. मग, ओ.सी. चा प्रश्न कुठे येतो?

**मा.आयुक्त :-**

त्यांनी जो ओ. सी. चा प्रश्न विचारलेला आहे तो वेगळ्या पध्दतीचा आहे.

**रोहिदास पाटील :-**

मग, त्यावेळी निधी किती मिळतो.

**मा. आयुक्त :-**

निधी मिळत नाही.

**जयंत पाटील :-**

साहेब, आपण पुर्वी ५० टक्के घेतो. आता आपण संपुर्ण घेतो. आता आपण १०० टक्के घेतो त्यामुळे जरी ओ. सी. घेतली नाही. ओ. सी. न घेण्याची कारणे वेगळी आहेत.

**मा. आयुक्त :-**

ओ. सी. जर घेतली नाही तर आपण त्या विकासकर्त्यांवर ॲक्शन घेतो.

**जयंत पाटील :-**

ओ. सी. न घेण्याची कारणे वेगळी आहेत. कारण एफ. एस. आय. कुठेतरी वाढवलेला असतो. स्टील पॅक केलेले असते त्यामुळे विकास कर थांबत नाही.

**मा. सभापती :-**

पुढचा विषय घ्या.

**रतन पाटील :-**

साहेब, १०७ वर बघा. शिक्षण मंडळातील शिक्षकांचे भविष्यनिर्वाह निधीचे लेखे वित्तीय वर्षाच्या शेवटी व्याजाचे परिगणना करुन समक्ष अधिका-यांच्या साक्षीने बंद करण्यात येवुन प्रत्येक शिक्षण कर्मचा-यास वर्षाच्या

शेवटी लेखाविवरण पत्र देणे आवश्यक आहे. सध्या शासननिर्णयाप्रमाणे महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना भविष्यनिर्वाह निधीवर रक्कमेवर आठ टक्के व्याज देते. परंतु, कर्मचाऱ्यांची रक्कम बँकेत गुंतवणुक केल्यास जवळपास आपल्याला साडे पाच टक्के व्याज मिळते आणि आपण कर्मचाऱ्यांना आठ टक्के देतो. आणि आपल्याला बँक साडे पाच टक्के देते. महापालिकेचा अडीच टक्के तोटा आहे. त्याच्यावर आताच विचार करा. आपल्याला कर्मचाऱ्यांना आठ टक्के भविष्यनिर्वाह निधी द्यावे लागेल.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, उत्तर असेल तर सांगा ना.

**सुरेश बनसोडे (मुख्य लेखापरिक्षक ) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो, सन्मा. सदस्य रतन पाटील साहेबांनी जो मुद्दा काढलेला आहे. ८ टक्के आणि अडीच टक्के यामधला फरकाचा जो मुद्दा काढलेला आहे त्याच्यामध्ये ओ. सी. चा त्यावेळेस जो रेट असतो. आपण त्या रेटने जास्तीत जास्त व्याज दर देण्याऱ्या बँकेत गुंतवणुक करतो. आपण दिलेल्या सुचनांची अमंजबजावणी आधीच लेखाविभागाकडे सुरु झालेली आहे. आता सन्मा. सदस्य श्री. रतन पाटील साहेब, मला सांगा की, आपल्याला जो रेट मिळालेला आहे ओ. बी. सी बँकेचा ९.२७ टक्के किंवा ९.१० टक्के किंवा ८.३५ टक्के हे दर ८ टक्क्यांनपेक्षा जास्त आहेत. त्यांची अमंजबजावणी लेखाशाखेकडुन आणि माझ्याकडुन झालेली आहे. आणि आता आम्ही सेम शिक्षण मंडळामध्ये सुध्दा इम्प्लीमेंट करण्याचा प्रयत्न करणार आहोत. जेणेकरुन, आपल्याला आठ टक्क्यावरती व्याज मिळेल आणि आपला जो तोटा आहे तो तोटा लॅप्स होउन जाईल. ह्या ज्या गुंतवणुक होत्या त्या पाच वर्षापुर्वी केल्या होत्या त्यावेळी ते बोलले होते. आता ज्या - ज्यावेळी त्या एन्ट्र्या क्लिअर होउन जातील. तेव्हा नवीन गुतंवणुक एन्ट्र्या आठ टक्केच्या वरच केल्या जातील असे स्पष्टीकरण दिल्या जातील धन्यवाद.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, आपले जे एक प्रतिनियुक्तीवर अधिकारी होते. त्यांनी अग्रीम घेतला होता त्याच्यामध्ये त्यांचा काही हिशोब होता तो देणे बाकी आहे. दिला आहे किंवा देणे बाकी आहे प्रशासनाने त्याचा खुलासा करावा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब, आक्षेपामध्ये ह्या सगळ्या बाबी नमुद केलेल्या आहेत. आपल्याला त्याची पुर्तता करायची आहे.

**शशिकांत भोईर :-**

मग, तुम्ही डॉ. बावीस्कर वर काय कारवाई करणार? ते तर सरकारी कर्मचारी सुध्दा नाही. आपण त्यांना असेच बाहेरुन घेतलेले होते. मग, तुम्ही त्यांच्यावर कोणती कारवाई करणार? त्याचा खुलासा केला पाहिजे.

**श्रीकांत मोरे :-**

जी रक्कम दिली होती त्याची वसुली झालेली आहे.

**शशिकांत पाटील :-**

झालेली आहे का?

**श्रीकांत मोरे :-**

होय.

**शशिकांत भोईर :-**

आक्षेपामध्ये पान क्र. २६ वर लेखापरिक्षणाचा जो अहवाल आहे. ते बघा. लेखाशाखेकडे असलेली ही तिजोरी सुरक्षित वाटत नाही. लेखाशाखेकडे कोणती तरी तिजोरी आहे.ती सुरक्षित नाही. त्यासाठी लेखाशाखेची तिजोरी भिंतीमध्ये सिमेंटच्या पक्क्या बांधकामामध्ये बसविणे अथवा स्ट्रॅंग रुम असणे आवश्यक आहे. ती स्ट्रॅंग रुम बनविण्यासाठी तात्काळ मंजुरी द्यावी नाहीतर कधीतरी चोरी होईल.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब तुम्हाला तेच सांगतो की, आपण जो आक्षेप घेतला आहे. आपल्याला त्याची पुर्तता करायची आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, आतापर्यंत आक्षेप सादर केले नाही म्हणुन आताच सादर केलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

आपल्याकडे आता आक्षेप समोर आलेले आहेत. तसे होणार नाही तेच तर तुम्हाला सांगतो.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, दुसरे वृक्षप्राधिकरण बद्दल आहे. ६ हजार ११८ झाडांचा तपशील सादर करावे , असे त्यांनी सांगितले आहे. ही झाडे कोठे कोठे आहेत? त्या झाडांच्या जागा कोठे आहेत?

**मा. आयुक्त :-**

आपल्या समोर सगळा अहवाल येईल .

**शशिकांत भोईर :-**

नक्की ना?

**मा. आयुक्त :-**

होय, म्हणुन तर तुम्हाला सांगतो ते वाचायची गरजच नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, वाचायचे नाही बोलायचे नाही तर मग काय करायचे?

**मा. सभापती :-**

एक महिन्यानंतर आक्षेप तुमच्या समोर येईल.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, परिवहनचा विषय आहे. आपण परिवहनचे सगळे ठेका पध्दतीने आहेत आपल्या बसेस सर्व ठेका पध्दतीने आहेत, जे कंडक्टर आहेत ते सुध्दा ठेका पध्दतीने आहेत आपण हे क्लर्क ठेका पध्दतीने दिले आणि ह्याच्यात आक्षेप दिले आहेत की, त्यांनी लाख रु. वसुल केले आहेत आणि ९९ हजार रु. भरले आहेत हजार रु. चा फरक येतोय मग, त्यांनी कसे भरायचे? तुम्ही बघा की, हे सर्व ठेका पध्दतीने आहेत. याला एकटे कोण जबाबदार नाही फक्त आपले मा. उपआयुक्त साहेब आहेत ते जबाबदार येतील त्यांच्याजवळ पैसे येत नाही त्यांनी रोज ते पैसे लेखाविभागाकडे देणे गरजेचे होते तीन - तीन दिवस पैसे आपल्याजवळ ठेवले आहे उद्याला ते लाखो रुपये जमा करतील आणि मध्ये जसे सुरेश तेली प्रकरण झालेले होते तसे आपले परिवहन प्रकरण उत्पन्न होईल.

**मा. आयुक्त :-**

तसे होणार नाही.

**शशिकांत भोईर :-**

कसे होणार नाही आपण ठेकेदाराबरोबर काय ॲग्रीमेंट बनवले आहे आणि जी रक्कम निर्लेखीत करणार आहोत त्याच्यवर आपण काय कारवाई करणार? त्याचा त्यांनी खुलासा करावा.

**अजीज शेख (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो परिवहन विभागामध्ये जे कर्मचारी सध्या ठेकेदारी पध्दतीने कार्यरत आहेत. आपण त्यांना लेबर सप्लाय पध्दतीने घेतलेले आहे. आणि आपण लेबर कॉन्ट्रॅक्ट बरोबर अतिशय सुस्पष्ट पध्दतीने तसे ॲग्रीमेंट करुन घेतलेले आहे जर असा प्रकार झाला तर आपण त्यांच्याकडुन ती वसुली करुन घेउ शकतो.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, बरोबर आहे मी तुमच्याशी सहमत आहे. परत तुम्हाला दाखवतो आपण प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे आणि यांच्याकडे भरण्यात आलेली प्रवासी कराबाबत तपशील खाली दिलेला आहे. आपल्याला १ लाख १७ हजार ९८४ रु. भरणा करायचा होता. आपण १ लाख १८ हजार ९८४ रु. भरले आहेत. म्हणजे १ हजार रु. जास्त दिले आहेत. म्हणजे ते परिवहन अधिकारी आपले काही खास होते का आपण त्यांना हजार रु. जास्त भरणा दिला आहे तर त्यांची चुकी आहे. मग असे अधिकारी सक्षम त्यांना ठेवुन काय फायदा आहे? नुसते पोसून त्यांना फायदा नाही.

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख सो.) :-**

आपण प्रत्येक महिन्याला परिवहन अधिकाऱ्यांकडे पैसे भरत असतो आणि त्याच्यामध्ये जास्त हजार रुपये जास्त भरले गेलेले असतील समजा इथे जास्त रक्कम भरली गेली तर आपण ती रक्कम पुढच्या वेळी ॲडजेस्ट करु शकतो. त्यामध्ये प्रशासनाचा कोणताही इन्टरफेअर नाही.

**शशिकांत भोईर :-**

काही जणांनी पैसे जास्तसुध्दा घेतले होते. आपल्याकडे तिकीट कलेक्टर आहे. समजा तिकीट क्लेक्टरने हजार रुपये जमा केले. आणि ते भरताना ९०० रु. भरले तर त्याचे काय करणार? त्याच्यावर नियंत्रण कोण ठेवणार? आणि ते प्रवासी चढताना आणि उतरतांना ही तिकीट बरोबर तपासुन घेत नाहीत. किलामिटर सुध्दा बघत नाही ते ही आक्षेप त्यात दिलेले जातात.

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख सो.) :-**

आपल्याकडे वाहतुकीबाबत बरीच सुधारणा झालेली आहे. आपण किलोमिटर प्रमाणे जी तिकीटे देतो ती सर्व तिकीटे ठरलेली असतात.

**शशिकांत भोईर :-**

मग, आक्षेपामध्ये त्यांनी कमी भरणा केलेला आहे. हे सुध्दा दाखवले आहे. पावत्या सुध्दा दिले नाही. त्यांनी पैसे भरले असुन सुध्दा त्यांना चलन दिले नाही. हे तुमचे आक्षेपच सांगत आहे.

**मा. उपायुक्त (श्री. अजिज शेख सो.) :-**

लेखापरिक्षकाने जे आक्षेप घेतलेले आहेत ना. आपल्याला त्याची पूर्तता करायची आहे. कोणी संबंधितांनी पुर्तता केली नाही किंवा जर त्यांच्याकडून पुर्तता झाली नाही तर आपण त्यांच्याकडून विशिष्ट रक्कम वसूल करणार आहोत.

**रतन पाटील :-**

साहेब, आपल्याला कोणार्कडून रु. २२ लाख येणार आहोत?

**मा. आयुक्त (सुदामराव गायकवाड साो.) :-**

जे आक्षेप घेतलेले आहे ते आक्षेप संबंधित विभागापर्यंत जात नाही. आणि त्यांचे जे काही म्हणणे आहे ते येत नाही. आपण तोपर्यंत निर्णया पर्यंत पोहोचू शकत नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, म्हणजे हे जे लेखापरिक्षक आहेत त्यांचे महापालिकेला आभार मानावे लागतील. त्यांनी महापालिकेच्या उत्पन्नाच्या दृष्टीने जे आक्षेप काढले होते. ज्यांच्या कडून वसूली आहे किंवा वसूली व्हायची आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर होणार आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपण त्यांचे अभिनंदन केले पाहिजे.

**रतन पाटील :-**

आपण त्यांचे अभिनंदन केले पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

आतापर्यंत मा. मुख्यलेखापरिक्षकांनी अहवाल आणले नव्हते. त्यामुळे त्यांचे अभिनंदन करण्यासाठी ते पात्र आहेत.

**रोहिदास पाटील :-**

लेखापरिक्षकांचा मा. महासभेच्या आश्वासनाचा ह्याच्यात उल्लेख का केला नाही? महानगरपालिकेच्या मा. महासभेमध्ये हे निश्चित सांगितले होते की, आपल्या महानगरपालिकेला परिवहन सेवा फायद्याची ठरेल. आज तुम्ही रु. १२ कोटी चे नुकसान केले ते का नाही आले? महानगरपालिकेला परिवहन सेवेकडून उत्पन्न मिळेल म्हणून असा ठराव केला जातो का?

**मा. सभापती साो. :-**

ते पुढच्या महिन्यात येईल. आपण चर्चा करु या.

**प्रकरण क्र. १८४ :-**

सन २००५-०६ या वित्तिय वर्षाचा वार्षिक लेखा परिक्षण अहवाल मा. स्थायी समितीस सादर करणे. (दि. २४/०१/२००७ चे तहकुब प्रकरण क्र. १७७)

**ठराव क्र. १८६ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६ (३) नुसार मुख्यलेखापरिक्षकांनी सन २००५-०६ सालाचा वार्षिक लेखापरिक्षण अहवाल मा. स्थायी समितीस सादर केलेला आहे. त्या अनुषंगाने मुख्य लेखापरिक्षकांनी काढलेल्या आक्षेपांचे तसेच केंद्र शासनाच्या महालेखापरिक्षक मुंबई यांनी काढलेल्या आक्षेपांची पुर्तता संबंधित विभागानी तात्काळ करून तसा अनुपालन अहवाल मुख्य लेखापरिक्षकांना सादर करावा व तसे केल्याचे स्थायी समितीस एक महिन्याच्या आत कळवावे असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्रीम. जेन्वी आल्मेडा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १८५ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, सदरचा हा विषय लिगल आहे की ईललिगल आहे ते पहिल्यांदा सांगा. प्रकरण क्रमांक १८५ चा विषय कायदेशीर आहे की बेकायदेशीर आहे एवढेच सांगा. मला उत्तर द्या.

**जयंत पाटील :-**

साहेब, प्रश्न असा आहे की, मुदत संपवून २ महिने झाले आहेत. मग, हा विषय एवढा उशिरा का आणला? मुदत संपलेली आहे आपण १ डिसेंबर २००६ पासून हा विषय मागतो. दोन महिने उलटून गेलेली

आहेत. असे नेहमी का घडते? याला जबाबदार कोण आहे? ह्या विषयाची मुदत संपून दोन महिने झालेले आहे. आणि तुम्ही आज विषय आणलेला आहे. म्हणजे याचा अर्थ असा की, आपल्याला मा. स्थायी समितीच्या परवानगीची गरज नाही.

**मा. आयुक्त :-**

तसे नाही.

**जयंत पाटील :-**

साहेब, तसेच आहे. दोन महिने उलटून गेल्यानंतर तो आपल्याकडे कसा काय काम करु शकतो?

**मा. आयुक्त :-**

याचा खुलासा करतो. प्रकरण क्रमांक १८५ अन्वये जो मुदतवाढीसाठीचा विषय ठेवलेला आहे. या संदर्भामध्ये याची थोडीशी पार्श्वभूमी मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपल्या सी. एफ्. सी मध्ये तीन पदे आपल्याला शासनाने मंजूरी केलेली होती. आणि आपण त्या तीन पदांच्या भरतीसाठी रितसर जाहिराती वगैरे प्रसिद्ध करुन त्यांच्या मुलाखती घेतलेल्या होत्या. आणि आपण मुलाखती घेउन उमेदवार निश्चित केलेले होते. त्यापैकी दोन उमेदवार कार्यान्वित झाले. एक उमेदवार उद्याप हजर झालेला नव्हता. आणि आपण जर हे उमेदवार घेतले तर आपण सी.एफ.सी चांगल्या पद्धतीने चालवू शकतो. असा एक आपल्याला विश्वास वाटत होता. परंतु, मिनव्हाईल ज्या अधिकाऱ्यांची नियुक्ती केली गेली. तो अधिकारी आजपर्यंतची हजर झालेला नाही. म्हणून आपण त्याची वाट बघत होतो. ह्याच्यामध्ये आपण कुठेतरी काय बेकायदेशीरपणा करतोय अशातला काही भाग नव्हता. आपण महानगरपालिकेचे हित नजरेसमोर ठेवूनच या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहत होतो. परंतु, कालपर्यंतसुद्धा अशा प्रकारचा अधिकारी हजर झालेल्या नसल्यामुळे आपले जे रुटीन चे काम आहे ते कुठेतरी थांबते. किंवा सन्मा. नगरसेवक जेव्हा एखादया करदात्यांची काही चूक झालेली असेल किंवा त्याची दुरूस्ती करायची असेल तर अशाप्रकारे सी.एफ.सी मध्ये जातात आणि त्यांच्याकडून योग्य त्या प्रमाणामध्ये कामाचा निपटारा होत नाही. म्हणून आपण असा विचार केला होता मागच्या मा. स्थायी समितीमध्ये हा विषय चर्चेला आला होता. आणि अशा प्रकारचे आरोप सन्मा. सदस्यांनी केलेले होते की, छोटया छोटया गोष्टीची सुद्धा दखल सी.एफ.सी. मध्ये घेतली जात नाही. मा. स्थायी समितीची सभा संपल्यानंतर मी माझ्या दालनामध्ये संबंधित अधिकाऱ्यांची बैठक तातडीने घेतली. आणि त्या बैठकीमध्ये मी त्यांना सुचना दिल्या. आणि तेव्हा आपल्या लक्षात आले की, अशाप्रकारचा हा प्रस्ताव मुव्ह झालेला आहे. आणि त्याला अजूनपर्यंत मंजूरी मिळालेली नाही. मी त्यांना असे सांगितले की, जोपर्यंत आपल्याकडे एखादा अधिकारी येत नाही. तोपर्यंत पूर्वीची सेवा बंद कशाला ठेवायची? ती चालू ठेवायला हवी होती. म्हणून, आपल्यासमोर हा विषय आणलेला आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, मा. स्थायी समितीने याला किती वेळा मुदतवाढ द्यायची? एकदा मा. स्थायी समितीने सहा महिन्याची मुदतावाढ दिली त्यांच्यानंतर हा विषय मा. महासभेपुढे राहिला पाहिजे होता. तसे न घेतल्याने तुम्ही हा विषय परत मा. स्थायी समितीसमोर आणता. हे योग्य नाही. म्हणून मी बोलत होता की, हा विषय लिगल आहे की इललिगल मा. स्थायी समितीने याला किती वेळा मुदतवाढ द्यायला पाहिजे? हा पूर्ण इललिगल आहे. आमच्याकडे हा विषयच राहू शकत नाही. हा विषय लगेचच मा. महासभेपुढे पाठवण्यात यावा. आणि ज्यावेळेस महानगरपालिका त्यांना एवढा पैसा देते. महानगरपालिका कशाला एवढा पैसा खर्च करते? आपण आपल्याकडे सक्षम अधिकारी नेमलेले आहेत.

**एस. ए. खान :-**

साहेब आपल्याकडे दोन अधिकारी आहेत ना. ते काही काम करत नाही.

**रतन पाटील :-**

त्याचबरोबर आमच्याकडे नियम आहेत. आम्ही नियमाचे पुस्तक दाखवतो.

**एस. ए. खान :-**

मा. आयुक्त साहेबांकडे किती तक्रारी केलेल्या आहेत.

**मा. आयुक्त :-**

आपल्या जिल्ह्यातल्या एका महापालिकेची सेवा आपण ते घेतलेले आहेत आणि या प्रकारचे त्याला मा. महासभेने मान्यता दिलेली असेल किंवा मा. स्थायी समितीने मान्यता दिलेली असेल, आणि आज आपण त्यांच्याकडुन घेतोय अशातला भाग नाही माझ्या माहितीप्रमाणे आपण जवळजवळ गेल्या दोन वर्षा पासुन सेवा घेत आहोत.

**रतन पाटील :-**

साहेब, आपण या जोडीला ॲग्रीमेंटची कॉपीसुध्दा लावायला पाहिजे होती. ते आपल्यातला ॲग्रीमेंटमध्ये काय सुविधा पुरवणार आहेत? आपल्याकडे कुठल्या सुविधा देणार आहेत? त्या किती पुर्ण केल्या आहेत. त्याची कोणालाही माहिती नाही.

**एस. ए. खान :-**

त्याची माहिती पाहिजे ना.

**रतन पाटील :-**

आपल्याकडे कूठली प्रणाली देणार आहेत?

**एस. ए. खान :-**

हा विषय होतच नाही.

**मा. आयुक्त :-**

समजा आपण कल्याण - डोंबिवली महानगरपालीकेशी जे काही ॲग्रीमेंट केलेली आहे आपल्याला त्यांची प्रत देण्यात येईल.

**रतन पाटील :-**

मी आजही सांगतो की, त्यांनी पुर्तता केलीच नाही ज्या - ज्या प्रणाली महानगरपालिकेला द्यायला पाहिजे होत्या त्याची पुर्तता केलेलीच नाही आणि आपल्याकडे किती आधिकारी येतात किती दिवस येतात, आपण त्यांना महिन्याला किती पगार देतो? साहेब, सहा महिन्यामध्ये आपल्या महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले . आपण त्यांना महिन्याला २ लाख रु. देतो. कशासाठी देतो? किती वेळा ते इथे येतात? ते देउ नये मी या मताशी आहे आणि महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान वाचलेले पाहिजे दुसरे काही नाही. शिवाय कामेसुध्दा होत नाहीत.

**एस. ए. खान :-**

शिवाय, भरपुर चुकीचे बिले निघालेली आहेत अजुन ते करेक्शन झालेले नाही. आपल्याला करेक्शन करायला डोंबिवलीला जावे लागेल का?

**रोहिदास पाटिल :-**

मा.आयुक्त साहेब,ह्या कॉम्प्युटर सिस्टीममध्ये आपली महानगरपालिका स्वबळावर ज्याला म्हणतात.आपण आपलेच ताकद तयार करून आपलेच तंत्रज्ञान विकसीत करून आपलीच माणसे विकसीत करू,असा प्रयत्न केला आहे की नाही?

**मा.आयुक्त.**

मी आपल्याला मघाशी तेच सांगितले.

**रोहीदास पाटील:-**

साहेब,तरीही आपण डिपेन्ड आहेत.आपण कोणत्याही कर्मच्याऱ्याला संधी दिली का? फी तुम्ही तुमच्या पुढच्या शिक्षणसाठी शिकुन घ्या साहेब, तेही होत नाही. महानगरपालिकेचा दुरदृष्टीकोन असला पाहिजे जेणेकरुन महापालिकेचे कामकाज सोप्या पध्दतीने होईल आणि आपले हुकुमी होईल असे न होता आपण पुन्हा कल्याणचे अधिकारी सिलेक्ट केले . कल्याणचे एजन्सीज कल्याणचा अधिकारी येत नाही. म्हणजे पुन्हा आपण डिपेन्डच राहिलो . त्या ऐवजी आपण जर आपल्याकडचा ट्रेनी तयार केले असता जर त्याला संधी दिली असती किंवा हे काम आपल्या परिने करुन घ्यावे आणि त्यात चुका झाल्या मग, ते मा. महासभेला म्हणा, मा. स्थायी समितीला म्हणा किंवा आपला स्टाफ असो म्हणजे मा. आयुक्त साहेबा पासुन ते मा. उपआयुक्त साहेबापर्यंत म्हणा त्यांच्याकडुन कदाचित चुक होउ शकते. आपण त्यांना संधी दिली पाहिजे आपण असेही प्रयत्न करत नाही आपण त्याच्यावर डिपेन्ड राहतो. ते आल्याशिवाय प्रोग्राम बदली होउ शकत नाही मध्यंतरी सन्मा. सदस्य खान साहेबांनी सांगितले होते की, एक शब्द म्हणजे रस्व - दिर्घ बदलायचा असेल तरी कल्याण वरुन माणुन आला पाहिजे . म्हणजे तो माणुस आपल्या हुकूमावरुन यायला पाहिजे का?

**मा. आयुक्त :-**

सन्मा सदस्य श्री. रोहिदास पाटील साहेब, तसे काही नाही. ज्या चुका किंवा ज्या त्रुटी आहेत. विधान मध्येच होतात. त्या सन्मा. सदस्य एस. ए. खान साहेबांना सुध्दा माझ्या माहितीप्रमाणे कागदोपत्री देखील दुरुस्ती करुन दिलेली आहे. परंतु त्याची जबाबदारी आपले कोणतेही कर्मचारी घेत नाहीत.

**शशिकांत भाईर :-**

आपले जे कोणी अधिकारी आहे त्यांनाच अधिकार द्या.

**रोहिदास पाटील :-**

आपण अधिकार द्यायला पाहिजे. जे सिलेक्ट झाले आहेत म्हणजे त्यांना सरळमार्गी प्रोग्राम फेल न होउ देण्याची त्यांनी शाश्वती द्यावी. की, असलेला प्रोग्राम वायफळ झाला नाही पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, तुम्ही जे प्रोग्राम बाबतीत म्हणत आहात त्या संदर्भामध्ये ते खुलासा करत आहेत ना. आपण कल्याण - डोंबिवलीचे जे काही सॉफ्टवेअर घेतलेले आहे त्या संदर्भा मध्ये ते काही खुलासा करत आहेत ते तुम्ही ऐकुन घ्या.

**रोहिदास पाटील :-**

आपण ते सॉफ्टवेअर सांभाळु शकतो ते नसेल तरी आपली सांभाळण्याची क्षमता असेले तर तसे निवेदन करा. आम्ही मा. महासभा मा. आयुक्त साहेबांना आग्रह करु मा. सभापतीला आग्रह करु की, त्यांना संधी देउन त्याच्याकडुन करुन घ्या ना आपण त्यांच्यावर किती दिवस डिपेन्ड राहणार?

**मा. आयुक्त :-**

आपण त्याच्यासाठी सोय केलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

आता चर्चेला जसा विषय आलेला की तो विषय आपण दोन महिने संपल्यानंतर मुदतवाढी आणतो. साहेब, ही कार्यपध्दती होउ शकत नाही. तरी सुध्दा त्यातुन जर कोणता मार्ग काढायचा असेल तर कोणतातरी मार्ग निघणे अपेक्षीतच आहे. नुसती चर्चा करुन मार्ग कसा निघेल?

**जेन्वी अल्मेडा :-**

त्यांना खुलासा करु द्या ना.

**राजकुमार घरत :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, के. डी. एम. सी मार्फत आपल्याला सॉफ्टवेअर पुरवलेले आहे. त्यांनी अशा बेसिसवर पुरवलेले आहे की, आपल्याला त्यांनी सोर्सकोड दिलेला नाही. जर त्यांनी आपल्याला सोर्सकोड उपलब्ध करुन दिले तर आपण या बिलांच्या दुरुस्तीची कामे करु शकतो.

**रतन पाटील :-**

साहेब, याचा अर्थ आपण जन्मभर त्यांच्याकडुन मदत घ्यायची का? आपण स्वतः उपस्थित करायचे आणि आपण त्यांच्याकडुन बनवुन घ्यायचे नाही का? आपण त्यांचे बांधिल आहोत का?

**रोहिदास पाटील :-**

आपण जशी ड्युप्लीकेट काढतो. आपण असा नवा प्रोग्राम बनवण्यासाठी त्याला किती एस्टिमेट येईल हे सांगु शकता का? आपण नवा प्रोग्राम बनवू या. तुम्हाला ही मा. महासभा प्रोग्राम नियमानुसार बनवून देईल.

**जेन्वी अल्मेडा :-**

म्हणजे, आपण त्यांच्यावर डिपेन्ड राहू शकत नाही, असे आहे. आपण काहींच्या वर किती डिपेन्ड राहणार. तुम्ही तुमचे एस्टिमेट तयार करा.

**रोहिदास पाटील :-**

अमुक एक प्रोग्राम आहे की आपण तो डेव्हलप करु शकतो. तुम्ही असे काही एस्टिमेट सांगु शकता का? लाख रु. आहे, २ लाख रु. आहे, ५ लाख रु. आहे. आपण कोट्यावधी रुपयाचे त्यांच्याकडे देतो. त्याच्यातून आपण पार्ट आणि पार्शल बाहेर काढले तर आपण एवढे बाहेर काढलेले आहे. मग, तर आपण डिपेन्ड नाही. अमुक कामासाठी लावू, असे आहे का? ते तुम्ही करु शकतात का?

**गीता जैन :-**

आपले ॲग्रीमेन्ट जे आहे त्यात काय आहे? दे हॅव्ह गिव्ह इट विथ दी सोर्सकोड विदाऊट सोर्सकोड वुई हॅव्ह डिपेडन्ट देम फॉर दी लाईफ टाईम.

**राजकुमार घरत :-**

विदाऊट सोर्सकोड.

**गीता जैन :-**

विदाऊट सोर्सकोड. मग ते मान्य कशात आहे?

**जयंत पाटील :-**

ह्याच्याबरोबर जो ठराव झाला त्या ठरावाची कॉपी कुठे आहे?

**रोहिदास पाटील :-**

ही त्यांची जी सिक्रेसी आहे की, त्यांची पॉलिसी आहे.

**एस. ए. खान :-**

ते अझ्युम करुन तीन ते चार बिले कलेक्ट झालेली नाहीत.

**रोहिदास पाटील :-**

ते त्यांची मोनोपॉली ठेवणारच ना.

**रतन पाटील :-**

त्यांची मोनोपॉली आपल्याला कशाला पाहिजे?

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, मी ह्यावर थोडे वक्तव्य करतो. मधे मी मा. सभापती साहेबांनासुध्दा मी निर्दशनास आणले होते आणि मा. आयुक्त साहेबांना सुध्दा सांगितले होते. आपल्या भिवंडीमध्ये रत्नागिरीचे श्री. सागर मा. करवंत त्यांनी मराठीमध्ये आकडेवारी दिलेली आहे आणि रु. ५ लाख मध्ये संपूर्ण सॉफ्टवेअर अठ्ठावीस विभागाचे आहे.

**रोहिदास पाटील :-**

भिवंडी नको. भाईंदरमध्ये कोणी करु शकतो की, नाही? भाईंदरमध्ये का केले नाही? भाईंदरमध्ये इतके एक्सपर्ट असताना आपण दुसऱ्यावर डिपेन्ड का राहतो? मा. सभापती साहेब, आम्ही तसा आग्रह धरतो. मा. आयुक्त साहेबांना समजवा.

**शशिकांत भोईर :-**

आपल्याकडेच शोधा ना. आपण त्यांना एवढे पैसे देऊन आपल्याला काय फायदा आहे?

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही जे म्हणतात तसे तुम्ही थांबवा आणि माणसांना संधी द्या.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, बरोबर आहे. कल्याण - डोबिंवलीच कशाला पाहिजे. इकडून देणे योग्य आहे आणि मराठीमध्ये येईल. आपल्याला इंग्लीशची गरज नाही.

**जेन्वी अल्मेडा :-**

आपण आपल्या स्वतःच्या भाषेमध्येच घ्यायचे आहे ना.

**शशिकांत भोईर :-**

कारण 'ए' दाबला तर 'डा' हा शब्द टाईप होतो.

**एस. ए. खान :-**

आपल्याला ते जमत नाही.

**शशिकांत भोईर :-**

अगोदरसुध्दा सॉफ्टवेअर केले लोक होते.

**मा. सभापती :-**

आपल्याला मिरा भाईंदर क्षेत्रामध्युसुध्दा सॉफ्टवेअर शिकलेली मुले आहेत ते बरोबर आहे.

**मा. आयुक्त :-**

समजा, स्थानिक किंवा कॉलेजमध्येसुध्दा जाणारी मुले असतील तर आपण त्यांना घेऊ शकतो.

**रोहिदास पाटील :-**

आपल्या भाईंदरमध्येसुध्दा सॉफ्टवेअर शिकलेली मुले आहेत.

**रतन पाटील :-**

भाईंदरमध्येसुध्दा चांगले टेक्निशियन्स आहेत.

**शशिकांत भोईर :-**

मागच्या वेळेला जाहिरात केलेली होती.

**रोहिदास पाटील :-**

आपण जर त्या मुलांना आपण महापालिकेचे काम करित आहोत याचा अभिमान वाटेल. आपण कोणाला तरी स्पॉन्सर करतो. म्हणून मी एवढे दिवस बोलत नव्हतो. परंतु, आपल्या कॉलेजमधून तीन बॅच निघाल्या त्या प्रोग्रॅम बनवतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा.आयुक्त साहेब, कल्याण-डोबिंवली महानगरपालिका जशी प्रणाली आहे. तशी मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रणाली बनेल का?

**शशिकांत भोईर :-**

होय,आपण बनवू शकतो ना.

**मा. आयुक्त. (श्री. सुदामराव गायकवाड सो.):-**

जी प्रणाली आहे ती संबंध महाराष्ट्रमध्ये प्रचलित आहे. कंपनीने कल्याण-डोबिंवली महानगरपालिकेसाठी हे काम केले होते आणि हे काम शासनाने त्यांची पूर्ण रॉयल्टी दिली आहे. कल्याण - डोबिंवली महानगरपालिकेला रॉयल्टी देउन त्यांची जी आद्यावली आहे. ही आज सरकारच्या ताब्यात आहे. आज त्याच्यावर सरकारची मालकी आहे.त्यामुळे,महाराष्ट्रामध्ये ज्या-ज्या ठिकाणी महानगरपालिका आहेत त्यांना आता वेगळ्या पध्दतीने पैसे द्यायची गरज नाही.समजा आज जर आपल्याला ते स्विकारायचे असेल तर ती आपण स्विकारु शकतो.पण,आपण याच्या पहीलीच ती स्विकारली आहे.म्हणजे त्यांना त्यांचे अमांउट देउन त्यांचे जे चार्जेस असतील ते देउन आपण स्विकारली आहे.

**जेन्वी अल्मेडा:-**

पण,साहेब,त्यांच्यात सोर्सकोडसुध्दा पाहिजे ना.

**मा. आयुक्त.(श्री. सुदामराव गायकवाड सो.):-**

तेच सांगतो,जर आपल्याला त्यांच्याकडून सोर्सकोड घ्यायचा असेल तर एक म्हणजे,त्यांच्याशी पत्रव्यवहार करायला पाहीजे किंवा आपल्याला त्यांचे ॲग्रीमेंन्ट टर्मिनेट करुन त्यांचा सोर्सकोड मागायचा.आणि आपण आपले स्वतंत्र्य कार्यप्रणाली सुरु करायची.

**जेन्वी अल्मेडा :-**

आपण एम्पायर करु या. तसे केलेच पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, समजा, जर आपण मुदतवाढ दिली नाही तर, आपले काम बंद होईल की चालू राहिल?

**रोहिदास पाटील :-**

अडचणीत येईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

काय प्रॉब्लेम आहे?

**मा. आयुक्त :-**

मा. सभागृहाला माझी विनंती अशी राहिल की, जरी समजा मी पाच महिन्याचा प्रस्ताव आपल्यासमोर सादर केलेला असला तरीसुध्दा आपण त्याच्यामध्ये मला साधारणतः तीन महिन्यासाठी परवानगी द्या किंवा चार महिन्यासाठी परवानगी द्या.

**शशिकांत भोईर :-**

तीन महिने चालेल.

**मा. आयुक्त :-**

परवानगी दिल्यानंतर त्यांच्याकडून आपण सोर्सकोड उपलब्ध करुन घेऊ. आपल्याला शासनाची जी तीन पदे मंजूर झालेले आहेत.त्यापैकी सिस्टिम मॅनेजर हया पदावरील माणूस अदयापपर्यंत आपल्याकडे हजर झालेले नाहीत. आपण त्यांची मुलाखती वगैरे सगळे घेतलेले आहे परंतू, ते हजर झालेले नाही. समजा, ते जर हजर झाले नाही आणि मला काल कळले की, ते हजर होणार नाही तर जो दुसरा वेटींग लिस्टवर असेल त्याची ताबडतोब नेमणूक करुन आपण हे संपूर्ण सी.एफ.सी. डिपार्टमेन्ट त्या तिधांच्या मार्फत चालवू या. आणि तीन महिन्याचा जो कालावधी आहे त्या तीन महिन्याच्या कालावधीमध्ये आपण त्यांचे सोर्सकोड परत घेऊ या.

**रतन पाटील :-**

साहेब, पण ते आपल्याला सोर्सकोड देणार आहे का?

**मा. आयुक्त :-**

ते आपल्याला सोर्सकोड देतील.

**रतन पाटील :-**

पण, तुम्ही म्हणता की, ॲग्रीमेन्ट मध्ये तसे नाही. साहेब, त्यांना मुदतवाढ देताना तसे ॲग्रीमेन्ट करुन घ्या ना.

**मा.सभापती सो. :-**

ते टर्मिनेट करावे लागेल, असे मा. आयुक्त साहेब बोलत आहेत.

**मा. आयुक्त :-**

ते पुर्वीचेच ॲग्रीमेन्ट आहे. आपण तेच पुढे कन्टिन्यू ठेवलेले आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, बरोबर आहे. तुम्ही माझ्या म्हणण्याचा अर्थ समजला नाही. आपण जुन्या ॲग्रीमेन्टप्रमाणे देणार आणि परत आता तुम्ही तीन महिन्याची मुदतवाढ देणार. म्हणजे, तो आपल्याला सोर्सकोड देणार आहे का?

**मा. आयुक्त :-**

आपण, त्यांच्याकडे तीन महिन्याची मुदतवाढ देउ या आणि त्यांचा जो सोर्सकोड आहे तो आपण ताब्यात घेउ या.

**मा. सभापती :-**

एकदा ॲग्रीमेंट बनविल्यानंतर त्यांची सेवा बंद करु या.

**रोहिदास पाटील :-**

तसा ठराव नको. मी, सांगतो त्याप्रमाणे ठराव घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, आपण आता ठराव करत नाही.

**रोहिदास पाटील :-**

मी तुम्हाला त्याचे परिणाम सांगतो ठराव कसा करायचा आहे? ते मी तुम्हाला सांगतो. साहेब, आपण ह्यात असे करु या की, कमीत कमी तीन महिने मुदतवाढ द्या.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील तीन महिनेच राहिलेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

हे अधिकार द्यायला पाहिजेत हे लक्षात घ्या हे अधिकार द्यायला पाहिजे.

**एस. ए. खान :-**

ह्यामध्येच महिने मागितलेच आहेत ना..

**मा. आयुक्त :-**

समजा, यामध्ये जर ही कार्यप्रणाली चांगल्याप्रकारे तर ज्या ठिकाणी आपल्याकडे ज्या काही चांगल्या शैक्षणीक संस्था आहेत. त्यांना ह्याच्यामध्ये आपण इनक्लुड करु या. आपण त्यांचे मार्गदर्शन घेउ या जेणे करुन आपले सी. एफ. सी. चांगल्या पध्दतीने चालेल.

**मा. सभापती :-**

दोन महिने गेलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

दोन महिने ऑलरेडी संपलेले आहेत आणि आता तीन महिनेच शिल्लक राहिलेले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

३० एप्रिल पर्यंत मुदत वाढ मागितली तेवढी द्या. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब दि. ३० एप्रिल पर्यंत मुदतवाढ मागितली आहे. फेब्रुवारी, मार्च, एप्रिल ३ महिने होत आलेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

तीन महिन्याची मुदतवाढ म्हणजे अजुन तीन महिन्याची मुदतवाढ देते वेळी त्यांच्यात तुम्ही हा ठराव लिहा की पार्ट ॲन्ड पार्शिली आपले जे काम चालु करते किंवा आपल्याला जे काही लागते त्याच्यामध्ये तो सोर्सकोड घेणे हा विषय वेगळा आहे आणि आपले आणि त्याच्यावर डेव्हलप करुन करुन आपल्या डिपार्टमेन्टवाइज विधीचा आणि पाण्याचा विषय वेगळा ठेवायला पाहिजे मग, हा एवढा कन्फ्युजन होणार नाही. आपण जर ते सॉफ्टवेअर डेव्हलप करुन घेतले. या मा. महासभेला त्यांना अधिकार द्यायला पाहिजे. तर ते लोक हे स्वतः करतील त्यांना दुसऱ्यापर्यंत जायला लागणार नाही....... ते त्या क्षमतेचे आहे किंवा ते तशी मदत घेउ शकतील आणि एक स्वतंत्र डिपार्टमेन्टवाईज म्हणजे आपण तिथले ॲग्रीमेन्ट तोडलेले नाही. आपण आपल्या स्वतः च्या पायावर उभे राहतो. साहेब, एक - दोन प्रोग्राम सक्सेस झाल्यावर तुम्ही पुन्हा पुन्हा त्याला सांगणार की, ते चालु राहु दे आपण आपले डेव्हलप करु या पण , जी बदनामी होते किंवा गैरसोय होते किंवा गैरसमज होते हा विषय येणार नाही असा नीट ठराव लिहुन द्या.

**एस. ए. खान :-**

मा. आयुक्त साहेब, आता ते बिल करेक्शन झाले नाही, तर त्याचे काय होईल? लोकांना बरेचसे बिल करेक्शन होउन गेले नाही.

**मा. आयुक्त :-**

ज्या बिलाचे करेक्शन झालेले नाही तुम्ही तेवढी माझ्याकडे आणुन द्या मी तुम्हाला एक - दोन दिवसामध्ये करेक्शन करुन देतो.

**एस. ए. खान :-**

पण आम्हाला कॅम्प्युटराईज बिल हवे आहे परंतु ती लोक आम्हाला हाताने लिहुन देतात.

**मा. आयुक्त :-**

तुम्हाला कम्प्युटराईज बिल मिळेल.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब बोलले की, कम्प्युटराईज बिल देतात.

**एस. ए. खान :-**

ठिक आहे.

**मा. सभापती :-**

पुढचा विषय घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ठराव कुठे मांडला आहे.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, तुम्ही करेक्शन करुन असे विषयामध्ये मांडा की पाच महिन्याची मुदतवाढ देउन मागील संस्थेसोबत केलेला करार रद्द करावा आणि त्यांच्याकडुन सोर्सकोड घेउन महापालिकेने स्वताःची यंत्रणा राबवावी. कारण आपण आपली कार्यप्रणाली राबवावी.

**रोहिदास पाटील :-**

टप्प्या - टप्प्याने राबवावी सोपे पडेल अशी राबवावी .

(सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. १८५ च्या ठरावाचे वाचन केले. )

**जेन्वी अल्मेडा :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

हा ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १८५ :-**

E-GOVERNACE करिता कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला तांत्रिक सेवेकामी मुदतवाढ देणेबाबत.

**ठराव क्र. १८७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्रात सर्व विभागांसाठी K.D.M.C. ची अज्ञाप्रणाली कार्यरत आहे. याद्वारे मुख्यत्वेकरून मालमत्ता करांची बिल व जन्ममृत्यु दाखले ही महत्वाची कामे महानगरपालिकेला वार्षिक ४० कोटी महसूल मिळवून देणारी कामे होतात. K.D.M.C. कडून माहे १ जुन २००६ ते नोव्हेंबर २००६ पर्यंत अशी सेवा घेण्यात आली. सदर कामी करारनामा करणेंस आला असुन करारनाम्यानुसार कामांची पुर्तता झालेली आहे. महानगरपालिकेस विभागीय कार्यालये संगणकीकृत करावयाची आहेत. त्याकामी व नागरी सुविधा केंद्रास या आज्ञाप्रणालीची आवश्यकता लागणार आहे. सदर कामी झालेला करार १ डिसेंबर २००६ ते ३० एप्रिल २००७ पर्यंत वाढवून देण्यास तसेच याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे. मुदतवाढ देवून मागील संस्थे सोबत केलेला करार रद्द करावा व सोर्सकोड घेवून महानगरपालिकेची स्वताची कार्यप्रणाली राबवावी.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्रीम. जेन्वी आल्मेडा.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १८६ चे वाचन केल )

**मा. सभापती :-**

या ठरावास मंजुरी देण्यात येत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेबांनी अवलोकन दिलेले आहेत सगळे बरोबर आहे आणि हे सगळे अवलोकन मंजुर करावे अशी मी मा. सभापती साहेबांना विनंती करतो.

**मा. सभापती :-**

हा ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १८६ :-**

मा. आयुक्त सो. यांनी शिफारस केलेल्या निविदेला मंजुरी देणे. (महानगरपालिकेची सन २००७ ची दैनंदिनी / दिनदर्शिका छपाई करणे) (भांडार विभाग)

**ठराव क्र. १८८ :-**

महानगरपालिकेने दि. २५/११/२००६ रोजी दै. "मुंबई संध्या" या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार महानगरपालिकेची सन २००७ ची दैनंदिनी / दिनदर्शिका छपाई करण्याकामी खालील ठेकेदारांनी आपली निविदा मुदतीत सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | तपशिल | मे. रेलीबल पॅकींग इंडस्ट्रीज | मे. साई श्रध्दा क्रियेशन | मे. सॉफ्ट टच |
|---|---|---|---|---|
| १ | एक्झिक्युटीव्ह डायरी | रु. ३७३/- प्र.नग | रु. ३६७/- प्र.नग | रु. ३४९/- प्र.नग |
| २ | दिनदर्शिका (कॅलेंडर) | रु. २६९/- प्र.नग | रु. २६२/- प्र.नग | रु. २४९/- प्र.नग |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. सॉफ्ट टच यांनी सादर केलेल्या निविदेतील दर सर्वात कमी आहेत. सदर निविदेतील दराबाबत झालेल्या वाटाघाटीत संबंधित ठेकेदाराकडून खालीलप्रमाणे दर कमी करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | निविदेतील दर | वाटाघाटी अंती दर |
|---|---|---|---|
| १ | एक्झिक्युटीव्ह डायरी | रु. ३४९/- प्र.नग | रु. ३४७/- प्र.नग |
| २ | दिनदर्शिका (कॅलेंडर) | रु. २४९/- प्र.नग | रु. २४७/- प्र.नग |

तरी सर्वात कमी दराची निविदा स्विकारण्यास मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेली असून सदर काम नियमानुसार असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम खंड ७ (क) अन्वये मा. स्थायी समिती सभेची मंजुरी मिळणेस शिफारस असे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १८७ चे वाचन केले. )

**मा. सभापती :-**

सदर प्रकरण मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १८७ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. १८९ :-**

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकरिता दुर्गंधी नाशके / उंदिर नाशके खरेदी कामी दि. ७/११/२००६ रोजी दै. महाराष्ट्र जनमुद्रा ह्या वृत्तपत्रात निविदा नोटीस प्रसिद्ध करून दि. १५/११/२००६ रोजी मोहरबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेस प्रतिसाद मिळून मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन, मे. रमेश ॲग्रो केम, मे. सुमती एन्टरप्रायजेस या निविदाकारांनी निविदा सादर केल्या आहेत. निविदांचा तांत्रिक लिफाफा क्र. १ दराचा लिफाफा क्र. २ दि. २३/११/२००६ रोजी उघडण्यात आले.

उपरोक्त निविदांकारांनी लिफाफा क्र. २ मध्ये सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **दुर्गंधी / उंदिर नाशकाचे नाव** | **मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन** | **मे. रमेश ॲग्रो केम** | **मे. सुमती एन्टरप्रायजेस** |
|---|---|---|---|---|
| १ | कोर्बोलीक पावडर (५ टक्के) | रू. २८/- प्रती किलो | रू. २८.६० प्रती किलो | **रू. २७.८० प्रती किलो** |
| २ | उंदिर नाशक | **रू. ४४९/- प्रती किलो** | रू. ४८०/- प्रती किलो | रू. ४८८/- प्रती किलो |

वरील प्रमाणे तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता मे. सुमती एन्टरप्रायजेस यांनी कोर्बोलीक पावडर ५ टक्के व मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन यांनी उंदिर नाशकाकरीता निविदेमध्ये सादर केलेला सर्वात कमी दर स्विकारण्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १८८ चे वाचन केले. )

**मा. सभापती :-**

सदर प्रकरण मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १८८ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. १९०:-**

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकरिता दुर्गंधी नाशके खरेदी कामी दि. ७/११/२००६ रोजी दै. सन्मीत्र ह्या वृत्तपत्रात निविदा नोटीस प्रसिद्ध करून दि. १५/११/२००६ रोजी मोहरबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेस प्रतिसाद मिळून मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन, मे रमेश ॲग्रो केम, मे. श्रीराम ॲग्रो एजन्सी या निविदाकारांनी निविदा सादर केल्या आहेत. निविदांचा तांत्रिक लिफाफा क्र. १ दराचा लिफाफा क्र. २ दि. २३/११/२००६ रोजी उघडण्यात आले.

उपरोक्त निविदांकारांनी लिफाफा क्र. २ मध्ये सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **दुर्गंधी नाशकाचे नाव** | **मे. डॉल्फीन सेल्स** | **मे. रमेश ॲग्रो केम** | **मे. श्रीराम ॲग्रो** |
|---|---|---|---|---|

| | | कॉर्पोरेशन | | एजन्सी |
|---|---|---|---|---|
| १ | मॅलेथीऑन पावडर ५ टक्के डि.पी. (डब्ल्यु.एच.ओ. स्पेसिफिकेशन प्रमाणे | रू. २६.८०/- प्रती किलो | रू. २६/- प्रती किलो | रू. २७.६८/- प्रती किलो |

वरील प्रमाणे तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता मे. योगी केमिकल्स यांनी ए.एफ.एम. लिक्वीड (स्पेशल) या दुर्गंधी नाशका करिता निविदेमध्ये सादर केलेला सर्वात कमी दर स्विकारण्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १८९ चे वाचन केले. )

**मा. सभापती :-**

सदर प्रकरण मंजुर करण्यांत येत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ह्याच्यामध्ये एक ॲडिशन करा. मा. आयुक्त साहेब आता फेब्रुवारी महिना चालु आहे आणि नाले - साफसफाईचे काम अजुन बाकी आहे तर, साहेब माझे असे मत आहे की, आरोग्य विभागाला ताबडतोब आदेश द्या आणि हे टेंडर काढण्यासाठी आपण कृपया त्वरित कारवाई करावी.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहेब, आपण मागच्या वेळेला मा. स्थायी समितीत ही चर्चा झालेली आहे. त्याप्रमाणे आपण त्यांना आदेश दिले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, आपण चर्चा करतो. तुम्ही मोकळ्या दिलाने आम्ही सांगितलेले सगळे ऐकुन घेता त्याला हो म्हणता तुम्ही कोठे जिद्द म्हणुन जाणवत नाही की, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब हे नको किंवा कोणालाही पण त्यांचे कार्य अंतिम काम होण्यासाठी त्याला जे करायला पाहिजले त्याच्यकडे साहेब आपण कुठेतरी चुकतोय. श्री. कांबळे साहेब मी काय म्हणतो ते माझे ऐका साहेब तुम्ही आम्हांला सांगितले की तुम्ही श्री. खांबित साहेबांना सांगितले की, श्री. कांबळे साहेबांना सांगितले श्री. वाणी साहेब आता दिसत नाही त्यांनाही सांगितले तुम्ही साईड व्हिजीट करायला सांगितले आजच्या घटकेला ते काम शुन्यावर आहे काहीच तिकडेही नाही गेले. इकडेही नाही गेले मागे नाही , पुढेही नाही , काहीच नाही मग साहेब, आपले काम कसे होणार? तुम्ही आम्हांला विरोध करतच नाही . आम्ही सार्वजनीक काम सांगतो पण ते पुढे चालतच नाही.

**दिपक खांबित :-**

सार्वजनीक बांधकाम विभागाशी संबधित काम घेतलेली आहेत.

**रोहिदास पाटील :-**

श्री. खांबित साहेब, आमचा गोल्डन नेस्ट रोडचा जो आग्रह होता तो सांडपाण्याचा निकास व्हावा. त्याठिकाणी इतके मच्छर झालेले आहेत आपल्या परिने निकास होणार नसेल तुमची बजेट प्रोव्हीजन होईल. तेव्हा पाण्याचा निकास होईल का?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, जी काही कायदेशीर तरतुद आहे आपण कायद्याला कूठे बदल करु शकत नाही. मला आपल्याला अशी विनंती करायची आहे की, बजेटमध्ये तरतुद होईल त्याला मा. महासभा मान्यता देईल. त्याच्यानंतर तोपर्यंत तुम्ही आंम्हाला ठराव करुन द्या

**रोहिदास पाटील :-**

आम्ही ठराव करुन देतो आपल्याला शहराच्य विकासाच्या दृष्टिने नागरिकांच्या हिताच्या दृष्टिने कोण नाही करायला सांगत नाही. मा. सभापती साहेब काही सांगत नाही. उलट आम्ही कशासाठी नाही सांगतो माजी मा. सभापती साहेबसुध्दा काही सांगणार नाही. आम्ही तुम्हाला कोणत्या भाषेत ठराव करुन देउ हे आम्हांला सांगा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बरोबर आहे.

**रोहिदास पाटील :-**

श्री. खांबित साहेब, कोणत्या भाषेत पाहिजे ते सांगा तुम्ही सांगणारही नाही करणारही नाही.

**दिपक खांबित :-**

महासभेमध्ये नाले सफाई करुन घेण्याबाबतच्या विषयावर चर्चा झालेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, मागच्या वेळेला मा. स्थायी समितीमध्ये ठराव सुध्दा झाला होता. आपण आरोग्य विभागामार्फत नाले सफाई करुन घ्यायची आणि त्याची जी बजेट. प्रोव्हीजन येईल ती आपल्या बजेट मध्ये करुन टाकुया.

**दिपक खांबित :-**

महासभेमध्ये मंजुरी घेउन पुढच्या वेळेला पास करुन घेउया.

**रोहिदास पाटील :-**

श्री. खांबित साहेब, मी तुम्हाला विनंती करतो मी त्या कामा बद्दल दोन महिने झाले ओरडतो. तरी काम एक नया पैसा पुढे सरकत नाही.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही त्यांना सांगा . त्यांना डिटेलसुध्दा द्या.

**रोहिदास पाटील :-**

पाणी निघू द्या. आम्ही काय म्हणतो पाणी काढा. कुठूनही पाणी काढा. पाणी काढा म्हणुन बोलतो तुम्ही ऐकतच नाही आणखी एक सांगतो की आता हा विषयांवर उत्तर द्यायला ते असेच उभे राहतील. आता नालेसफाई करायला आपण ऑर्डर देउन सांगितली नालेसफाई करा. तेही सांगत नाही आम्ही सांगतो तेही ऐकत नाही साहेब आम्ही नालेसफाई करतेवेळी पाणी चालू राहिले पाहिजे ह्यांनी तुमच्याकडे नोट दिली का? नाही दिली. ती नोट त्यांनी अधिका-यांना द्यायला पाहिजे. की नउ इंचाचे पाईप घ्या.गटाराचे पाणी चालू राहायला पाहिजे. म्हणजे १०० फुट पाईप जोडला तर पाणी चालू राहिल. इथे बांध, तिथे बांध, तर तळापासून माती काढता येईल. नाहीतर ते लोक माती गाळ काढू शकणार नाही. तुम्ही कोणतेही नवी डिझाईन घ्यायला तयार नाही. हे लोक त्याचे काही सांगत नाही.

**मा. आयुक्त सो. :-**

तुम्ही खुलासा करा. त्यांना सांगा की, तुम्ही काय करतात?

**मा. सभापती :-**

तुमचा हा विषय चालू द्या. पण, त्याच्या अगोदर मी डाय-या वाटप करतो.

**प्रकरण क्र. १८९ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेल्या निविदेचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. १९१ :-**

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकरिता दुर्गंधी नाशके खरेदी कामी दि. ७/११/२००६ रोजी दै. जनमत ह्या वृत्तपत्रात निविदा नोटीस प्रसिद्ध करून दि. १५/११/२००६ रोजी मोहरबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेस प्रतिसाद मिळून मे. मे. सुहरीद केमिकल्स, मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन, मे. मे योगी केमिकल्स या निविदाकारांनी निविदा सादर केल्या आहेत. निविदांचा तांत्रिक लिफाफा क्र. १ दराचा लिफाफा क्र. २ दि. २३/११/२००६ रोजी उघडण्यात आले.

उपरोक्त निविदांकारांनी लिफाफा क्र. २ मध्ये सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | दुर्गंधी नाशकाचे नाव | मे. सुहरीद केमिकल्स | मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन | मे. योगी केमिकल्स |
|---|---|---|---|---|
| १ | ए.एफ.एम लिक्वीड | रू. २१५/- प्रती किलो | रू. २२९/- प्रती किलो | रू. २०५/- प्रती किलो |

वरील प्रमाणे तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता मे. योगी केमिकल्स यांनी ए.एफ.एम. लिक्वीड (स्पेशल) या दुर्गंधी नाशका करिता निविदेमध्ये सादर केलेला सर्वात कमी दर स्विकारण्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**रोहिदास पाटील :-**

मा. स्थायी समितीच्या सदस्यांना किती डायऱ्या देणार? गटनेतेला किती देणार?

**मा. सभापती :-**

पाच-पाच डायऱ्या देणार

**जयंत पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, आपल्या आणि मागच्या सभापती साहेबांमध्ये विशेष फरक जाणवत नाही. आपण डायऱ्या आम्हाला ३१ तारखेला घरी देणार होतात. घरपोच देणार होतात आम्ही तुमच्याबद्दल फरक समजत होतो. की, तुम्ही आम्हाला ३१ तारखेला डायऱ्या देणार होते.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेबांना तुम्ही जाब विचारा.

**जयंत पाटील :-**

आम्ही तुम्हाला पिठासीन अधिकारी केलेले आहे.

**मा. सभापती :-**

तुम्ही बोलता ते बरोबर आहे. शासकीय नियमाला साथ दिली नाही. पिठासीन अधिकारी कुठे कमी पडले हे तुम्ही विचारात घ्या.

**जयंत पाटील :-**

एक महिना कमी पडला. साहेब, आपण मान्य करा की, एक महिना लेट झाला. एक महिन्याची पाने आम्ही फाडू का? आम्हाला मा. सभापतींसाहेबांनी आश्वासन दिले होते.

**मा. सभापती :-**

बरोबर आहे. मी तुमच्याशी सहमत आहे.

**जयंत पाटील :-**

का लेट झाले याचे आम्हाला कारणतरी समजू द्या.

**मा. आयुक्त सो :-**

टेंडर प्रोसिजरमध्ये थोडासा विलंब झाला.

**रोहिदास पाटील :-**

ह्या डायरीमध्ये विधानपरिषदेच्या दोन सदस्यांचे फोटो का नाही? विधानपरिषदेचे एकच सदस्य आहेत का? मा. आयुक्त साहेब, तुम्हाला माहित आहे का? मा. सचिव साहेब, तुम्हाला माहित आहे की नाही? मा. सभापतीसाहेबांना माहित नसेल असे समजूया. मा. सभापतीसाहेब, मा. सचिव साहेब तुम्ही एक विधान परिषदेचा सदस्य घेतला. तुम्ही दोन सदस्य आणखिन का घेतले का नाही? सांगा, उत्तर द्या? मा. आयुक्त साहेब, उत्तर द्यावे लागेल मी मा. सभापतीसाहेबां कडून अपेक्षा करत नाही. कदाचित त्यांच्या लक्षात नसेल पण, तुमच्या लक्षात असायला पाहिजे होते.

**रतन पाटील :-**

साहेब याची क्वान्टीटी किती आहे?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ह्यामध्ये का. अभियंता आहे. म्हणजे काय? श्री. दिपक खांबितसाहेब, का. अभियंता आहे. म्हणजे काय? ही कुठली नवीन पोस्ट आली?

**एस. ए. खान :-**

मा. आयुक्तसाहेब, मागेसुद्धा मी सांगितले होते. माझे ॲडव्होकेटचे डॉक्टर करुन टाकले आहे. दोन वेळा डॉक्टर केले आहे. हे काय आहे? मागे एवढे सांगितले तक्रार केली.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ही डायरी कोणी छापली? श्री. गोखले साहेब, ह्यामध्ये प्र. सा. न. रचनाकार हे काय आहे? का. अभियंता म्हणजे काय?

**रोहिदास पाटील :-**

पहिल्यांदा मा. आयुक्तसाहेब, डायऱ्यामध्ये विधानपरिषदेचे दोन सदस्य का आले नाही? याचा खुलासा करा. सगळे चुकवून डायरी वाटप करता असे के आहे?

**शशिकांत भोईर :-**

मी नवीन फोटो दिलेला होता. माझा जुनाच फोटो लावलेला आहे. माझा नवीन फोटो नाही. तुम्हाला तेव्हाच सांगितले की, डायरीमध्ये चुका आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ह्यामध्ये त्या सदस्यांचे फोटो टाकायला सांगा. आणि ह्या ज्या चुका झालेल्या आहेत. त्या चुका सुधारुन डायरीमध्ये ॲडीशन करा.

**रोहिदास पाटील :-**

ज्या चुका झालेल्या आहेत त्या भरुन घ्या. हा विषय वादाचा नाही.

**शशिकांत भोईर :-**

त्याच्यात माझासुद्धा नवीन फोटो पाहिजे. मी जुना फोटो एक्सेप्ट करणार नाही. फोटोग्राफरला फोटो दिलेला आहे. हा फोटो मला मान्य नाही. नवीन फोटो काढून दिलेला आहे.

**एस. ए. खान :-**

फोन नंबरसुद्धा चुकीचा छापलेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्तसाहेब, आरोग्य विभागामार्फत नाले सफाई मार्च आणि एप्रिलअगोदर करुन घ्यावी, अशी मी आपल्याला विनंती करतो. साहेब, त्याच प्रमाणे नाले सफाई ही मार्च आणि एप्रिल, मे या दोन - तीन महिन्यामध्ये आरोग्य विभागामार्फत लवकर करुन घ्यावी, अशी तुम्हाला विनंती आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही मागच्या वेळेला सांगितले होते की, नालेसफाईचे फोटोसुद्धा काढून आणा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आम्ही फक्त नालेसफाई करायला सांगितली होती.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तसेच आपला जो रेल्वे समांतर नाला आहे. तिथे जी कलवट बांधायची आहे. ती पावसा अगोदर  झाली पाहिजे आपले श्री. खांबित साहेब, स्वतः पाहणी करणार होते त्याचे काय झाले? आम्हाला त्याचा अहवाल सुध्दा सादर केला नाही .

**रतन पाटील :-**

रेल्वेचे कलवट पावसाळ्या अगोदर होतील का?

**मा. सभापती :-**

तुम्ही एकाच विषयावर बोला.

**रतन पाटील :-**

हा एकच विषय आहे.

**दिपक खांबित :-**

परंतु, या ठिकाणी तो विषय नाही.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तो विषय विषयपत्रिकेवर नसला तरी तुम्ही आठ दिवसांमध्ये सादर करणार होते. श्री. खांबित साहेब आणि श्री. वाणी साहेब अहवाल सादर करणार होते ते कलवट बाबतचा अहवाल सादर करणार होते. साहेब, तुम्ही मा. महासभेमध्ये याबाबत सांगितलेले होते.

**दिपक खांबित :-**

महासभेमध्ये सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील बोलले होते.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही आठ दिवसामध्ये अहवाल सादर करणार होते जर पावसाळ्यापुर्वी ते काम झाले नाही तर रेल्वे समांतर जो रोड आहे. तो संपुर्ण भारुन जाईल आणि तो संपुर्ण परिसर जलमय होईल.

**रतन पाटील :-**

तेथील पाणी निघत नाही. त्यामुळे आरोग्य अधिकाऱ्यांनी प्रत्यक्षपणे पाहणी करुन घ्यावी.

**शशिकांत भोईर :-**

आता सुध्दा तेथील पाणी निघत नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, तेथील पाणी निघत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपण आता ठराव करुन टाकू. ह्याला टेंडर भरपुर आहे.

**एस. ए. खान :-**

माझा डायरी मध्ये फोन नंबर चुकीचा आहे. ॲडव्होकेटच्या जागी डॉक्टर लिहीलेले आहे. त्यावर काय करणार? दुरुस्ती करुन घ्या.

**शशिकांत भोईर :-**

पाणीपुरवठा आणि पाण्याच्या प्रेशरचा अहवाल दिलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

पाईप घेतलेला आहे? श्री. कांबळे साहेब, तुम्हाला पाईप पाहिजे ना. साहेब, त्यांना ते साफ करायला नवीन पाईप घ्यायचे आहेत.

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा कर्मचारी वर्ग यांचे मी हार्दिक आभार मानुन आजची सभा संपल्याचे जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १२.४५ वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**